मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २७२ | सोमवार, १५ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

## शाहीर गणेश मेश्राम राज्यस्तरीय खडी गंमत कला पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी** : तुमसर तालुक्यात वास्तव्यात असलेले शाहीर गणेश मेश्राम यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही

म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. शाहीर गणेश मेश्राम यांना खडी गंमत राज्यस्तरीय कला पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित



करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त

## बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे 94 बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने 2025-26 मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी



आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून "कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा" या योजनेसाठी 50 लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील 4 बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

## एसी लोकलमध्ये अनधिकृत वावरामुळे प्रवासी त्रस्त; अतिरिक्त भाडे भरूनही सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक युवक आधार**

**मिरा - भाईंदर, प्रतिनिधी - बाळकृष्ण परब** : पश्चिम रेल्वेच्या एसी लोकल ट्रेनमध्ये दिवसेंदिवस वाढत असलेल्या भिकारी, फेरीवाले आणि तृतीयपंथीयांच्या अनधिकृत वावरामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आरामदायी, सुरक्षित आणि त्रासमुक्त प्रवासासाठी नियमित लोकलपेक्षा अधिक भाडे भरून एसी लोकलची निवड करणाऱ्या प्रवाशांना मात्र अपेक्षित सुविधा मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, अनेक एसी लोकल गाड्यांमध्ये पेन, खेळणी आणि इतर किरकोळ वस्तू विकणारे फेरीवाले सहजपणे डब्यांमध्ये फिरताना दिसतात. त्याचबरोबर काही भिकारी आणि तृतीयपंथीय प्रवाशांकडे पैसे मागण्यासाठी वारंवार येत असल्याने प्रवासादरम्यान अस्वस्थ वातावरण निर्माण होत आहे. विशेषतः कार्यालयीन वेळेत गर्दीच्या वेळी अशा प्रकारांमुळे प्रवाशांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले जात आहे.महिला प्रवासी, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांनीही या प्रकाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. एसी डब्यांमध्ये प्रवेशासाठी विशेष तिकीट आवश्यक असतानाही अनधिकृत व्यक्ती सहजपणे डब्यांमध्ये कशा प्रवेश करतात, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. रेल्वे प्रशासनाच्या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळेच हा प्रकार वाढत असल्याचा आरोपही काही प्रवाशांनी केला आहे.

दररोज हजारो प्रवासी अतिरिक्त भाडे भरून एसी लोकलचा वापर करतात. मात्र, डब्यांमध्ये होणारी विक्री, पैसे मागण्यासाठी होणारी वारंवार विनवणी आणि काही वेळा प्रवाशांशी होणारे वाद यामुळे प्रवासाचा अनुभव खराब होत आहे. अनेक प्रवाशांनी सोशल मीडियावर तसेच रेल्वे प्रशासनाकडे याबाबत तक्रारी केल्या आहेत.प्रवाशांचे म्हणणे आहे की, रेल्वे सुरक्षा दल (RPF) आणि तिकीट तपासणी पथकांनी अधिक सक्रिय भूमिका घेण्याची गरज आहे. एसी डब्यांमध्ये नियमित गस्त, अनधिकृत व्यक्तींवर कठोर कारवाई आणि स्थानकांवरील प्रवेश नियंत्रण अधिक प्रभावी केल्यास या समस्येवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते.

मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या लोकल रेल्वे सेवेबाबत प्रवाशांचा विश्वास कायम राखण्यासाठी आणि एसी लोकलच्या दर्जानुसार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. अन्यथा, अतिरिक्त भाडे भरूनही त्रासदायक प्रवासाचा सामना करावा लागत असल्याची भावना अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्काराने मोहन कदम यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज):** पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे मोहन कदम यांना महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था,नवीन पनवेल यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय कार्यदर्पण गौरव संमेलनामध्ये "राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले.समाजहितासाठी सातत्याने कार्य करत असलेल्या मोहन कदम यांनी पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.त्यांच्या कार्यामुळे समाजात जनजागृती निर्माण होण्यास तसेच विविध सामाजिक उपक्रमांना चालना मिळण्यास मदत झाली आहे.संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या सन्मानपत्रात त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले असून,भविष्यातही समाजसेवेच्या



माध्यमातून त्यांनी अधिक उंची गाठावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मोहन कदम यांनी संस्थेचे आभार मानत समाजहिताचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## शासकीय मुलींच्या बालगृहात 'मॅजिक विथ लॉजिक'द्वारे अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस), सावी फाउंडेशन नागपूर आणि महिला व बाल कल्याण विभाग, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय मुलींच्या बालगृहात आयोजित करण्यात आलेला 'सर्वांगीण विकास शिबिर – मॅजिक विथ लॉजिक' हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद, मानवतावाद आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमात बालगृहातील सुमारे ५० निवासी मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

योगेश वनकर आणि प्रियांका बागडे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी मुलींशी संवाद साधत अंधश्रद्धेचे दुष्परिणाम आणि वैज्ञानिक विचारसरणीचे महत्त्व समजावून सांगितले.



विद्यार्थिनींमध्ये चिकित्सक वृत्ती निर्माण व्हावी, कोणत्याही गोष्टीचा विवेकबुद्धीने विचार करण्याची सवय लागावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

यावेळी अंनिसचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी तथाकथित चमत्कारांचे प्रात्यक्षिक सादर करून त्यामागील वैज्ञानिक कारणे उलगडून दाखविली. अनेक वेळा लोकांना दैवी शक्ती किंवा अलौकिक घटना वाटणाऱ्या गोष्टी प्रत्यक्षात विज्ञानाच्या आधारे कशा घडतात, हे त्यांनी प्रभावी पद्धतीने स्पष्ट केले. संवादात्मक शैलीत मुलींना प्रश्न विचारून त्यांनी अंधश्रद्धेमुळे व्यक्ती व समाजाला होणाऱ्या मानसिक, आर्थिक आणि सामाजिक नुकसानाची जाणीव करून दिली.

कार्यक्रमादरम्यान इंजि. कमलाकर सतदेवे यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून संविधानातील मूल्ये, समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले. संविधानिक मूल्यांच्या आधारे वैज्ञानिक व विवेकनिष्ठ समाज घडविण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून पुष्पाताई बौद्ध उपस्थित होत्या. त्यांनी मुलींना शिक्षण, आत्मविश्वास आणि सकारात्मक विचारांच्या माध्यमातून जीवनात यश संपादन करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन सुलोचना खांडेकर यांनी केले, तर त्रिवेणी गडपायले यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वर्षा सहारे, वंदना मेंढे, वर्षा टेंभेकर, रंजना ठवरे, शारदा मोटघरे, ॲड. विद्या खोब्रागडे, त्रिशला बोदिले, दीप्ती नाईक, शीला डोंगरे, विनाताई कोठारे, शारदाताई मोटघरे तसेच इतर अनेक कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.

या उपक्रमामुळे बालगृहातील मुलींमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकशील विचार आणि अंधश्रद्धेविरोधातील जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली.

उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांची सातत्याने आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.


# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीला वेग

## सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे:रोहयो मंत्री भरत गोगावले

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : दुर्गराज रायगडावर तिथीनुसार दि. 27 जून 20 रोजी थितीअनुसार साजऱ्या होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या तयारीला वेग आला असून, सोहळ्याचे नियोजन सुयोग्य, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी दिले. महाड येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या विविध तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी पंचायत समिती महाडच्या सभापती प्रेरणा सावंत, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, उपजिल्हाधिकारी डॉ. रविंद्र शेळके, विविध विभागांचे अधिकारी

मंत्री श्री. गोगावले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेकाचा



ऐतिहासिक सोहळा हा महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेचे प्रतीक आहे. दरवर्षी हजारो शिवभक्त या सोहळ्यासाठी रायगडावर येत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेसह सर्व मूलभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रातील कामे वेळेत पूर्ण करून सोहळा यशस्वी करण्यासाठी योगदान द्यावे. सोहळ्यादरम्यान पावसाची शक्यता लक्षात घेऊन मंडप, भोजन, विद्युत पुरवठा, पिण्याचे पाणी, स्वच्छता आणि आरोग्य सुविधा सक्षम ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, स्ट्रेचर आणि आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्यावर भर दिला. सर्पदंशासारख्या संभाव्य घटनांच्या अनुषंगाने आवश्यक उपचार साहित्य आणि औषधे उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले की, शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या अनुषंगाने प्रशासनाने विविध समित्यांची स्थापना केली असून आरोग्य, पाणीपुरवठा, परिवहन, विद्युत, खानपान, मंडप, स्वच्छता, शौचालय व्यवस्था, राजशिष्टाचार आणि सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन सुरू आहे. शिवभक्तांना कोणतीही गैरसोय होणार नाही यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असून समितीनिहाय कामांचा नियमित आढावा घेतला जात आहे. बैठकीत विविध समित्यांनी आतापर्यंत झालेल्या तयारीचा आढावा सादर केला. तसेच कोकणकडा मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनीही सोहळ्याच्या नियोजनासंदर्भात विविध सूचना मांडल्या.

# कुमारी संजना संजीव भांबोरे ब्ल्यू स्टार्म पत्रकारिता राज्यस्तरीय अँकरिंग पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी** -पहेला येथील रहिवाशी कुमारी संजना संजीव भांबोरे यांचा पहेला येथे सन्मान घ्या व सन्मान द्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक



बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. कुमारी संजना संजीव भांबोरे ह्या पत्रकारीता क्षेत्रात ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चैनल मध्ये चॅनलमध्ये उत्कृष्ट अँकरिंग चे काम करत असून त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या सन्मान करण्यात आला.

यांप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले . त्यांच्या या पुरस्काराबद्दल महाराष्ट्रातील अनेक चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड शिवाजी अण्णा कराळे

## उपाध्यक्ष पदी ॲड अनिता दिघे आणि सचिव पदी ॲड शिवाजी सांगळे यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**अहिल्यानगर प्रतिनिधी** : सुमारे २०० वर्षांची वैभवशाली परंपरा लाभलेल्या शहरातील जुन्या न्यायालयात असलेल्या कौटुंबिक न्यायालयातील वकिलांच्या फॅमिली कोर्ट ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी ॲड शिवाजी अण्णा कराळे यांची तर उपाध्यक्षपदी ॲड.अनिता दिघे, कार्याध्यक्षपदी ॲड.लक्ष्मण कचरे, सचिवपदी ॲड.शिवाजी सांगळे, खजिनदारपदी ॲड.बाबाजी सांगळे व महिला सचिवपदी ॲड पल्लवी दातीर यांच्यासह कार्यकारणी सदस्यांची बिनविरोध निवड झाली. असोसिएशनचे मावळते अध्यक्ष ॲड. लक्ष्मण कचरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या असोसिएशनच्या बैठकीत सर्वानुमते नूतन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून अभिनंदन



करण्यात आले. २०२६ ते २८ या दोन वर्षांसाठी या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

या बैठकीमध्ये असोसिएशनच्या कार्यकारिणी सदस्यपदी जेष्ठ विधिज्ञ ॲड.सुरेश लगड, ॲड.मच्छिंद्र आंबेकर, ॲड.कल्याण पागर, ॲड.पोपट म्हस्के, ॲड.मनीषा केळगंद्रे-शिंदे, ॲड.राजेश कावरे व ॲड.कु.किरण जाधव आदींच्याही सर्वानुमते नियुक्त्या करण्यात आल्या. या बैठकीत अध्यक्ष पदासाठी शिवाजी कराळे यांच्या नावाची सूचना सुरेश लगड यांनी मांडली त्यास राजेश कावरे यांनी अनुमोदन दिले.

फॅमिली कोर्ट बार असोसिएशनचे नूतन अध्यक्ष ॲड.शिवाजी अण्णा कराळे हे गेल्या ३१ वर्षांपासून वकील क्षेत्रात कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी २०१३ ते १४ या काळात अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. तसेच २०२२ साली ते कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे संस्थापक अध्यक्षही होते. आता दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी ॲड.कराळे यांना मिळाली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड कल्याण पागर यांनी कामकाज पाहिले.

यावेळी ॲड.शिवाजी कराळे म्हणाले, जुन्या न्यायालयाला २०० वर्ष पूर्ण झाले आहेत. अशा मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या न्यायालयातील फॅमिली कोर्ट बार असोसिएशनच्या अध्यक्षपदाची जबाबदारी मिळणे हे माझे मोठे भाग्य आहे. अध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा माझ्यावर टाकून सर्व सदस्यांनी मोठा विश्वास व्यक्त केला आहे. या पदाच्या माध्यमातून वकिलांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याबरोबरच बार व बेंच मध्ये सकारात्मक वातावरण ठेवण्यास प्राधान्य देऊ.

तसेच सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पर्यावरण असे विविध क्षेत्रातील उपक्रम राबवण्यावर भर देणार आहे. सर्व वकील बंधुभगिनींना बरोबर कामकाज करणार आहे.

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसे रेल्वे कामगार सेनेचे विविध समाजोपयोगी उपक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर . गुडेकर, जिल्हा प्रतिनिधी प्रमुख** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा. राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेच्या विविध शाखांच्या वतीने रेल्वे कर्मचारी, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आरोग्य, पर्यावरण, रक्तदान आणि कामगार कल्याण या क्षेत्रांतील उपक्रमांमधून संघटनेची सामाजिक बांधिलकी अधोरेखित झाली.

मनसे नेते मा. अमित ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेचे अध्यक्ष श्री. जितेंद्र पाटील यांच्या आदेशानुसार तसेच केंद्रीय सचिव श्री. स्वप्निल पंडित यांच्या सूचनेनुसार हे सर्व उपक्रम राबविण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज



टर्मिनस (सीएसएमटी) येथे रेल्वे कर्मचारी, त्यांच्या कुटुंबीयांसह नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरात विविध आजारांची तपासणी, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन व आरोग्यविषयक सल्ला देण्यात आला.

याशिवाय रेल्वेच्या OHE आणि CFO विभागातील कर्मचाऱ्यांना पेन व मिठाईचे वाटप करून त्यांच्या सेवेला मानवंदना देण्यात आली. महालक्ष्मी शाखेच्या वतीने आयोजित भव्य रक्तदान शिबिरात रेल्वे कर्मचारी, युवक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले.

दरम्यान, आज दिनांक १४ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजता भायखळा रेल्वे स्थानक (पश्चिम) परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेचे केंद्रीय चिटणीस श्री. निलेश दुर्वांस खोत यांच्या पुढाकाराने व नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत यावेळी २० लहान-मोठ्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाला स्टेशन प्रबंधक श्री. स्वेन, उपप्रबंधक श्री. सावंत, आरपीएफ इन्स्पेक्टर व कर्मचारी, मुंबई विभाग महिला अध्यक्षा कु. सुकन्या मणी, उपाध्यक्ष श्री. शरीफ गौरी, श्री. दीपक सोलंकी, युनिट अध्यक्ष श्री. राजू दुराई, महाराष्ट्र सैनिक, रेल्वे कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री. निलेश दुर्वांस खोत यांनी पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असल्याचे सांगत प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण आणि तापमानवाढ लक्षात घेता अशा उपक्रमांमुळे समाजात पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त करण्याबरोबरच समाजोपयोगी कार्यातून त्यांना अभिवादन करण्याचा संदेश या सर्व उपक्रमांतून देण्यात आला. आरोग्य, रक्तदान, पर्यावरण संवर्धन आणि कामगार सन्मान या माध्यमातून महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेनेने समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली.

# आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांचा बीड ते मंत्रालय लॉर्गमार्च



**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : आरक्षण उपवर्गिकरण हे या देशातील अनुसूचित जाती, जमातीसाठी धोक्याची घंटा आहे. हि घंटा आमचातील कोणी कोणी वाजवणार आहे त्यांना धडा शिकवण्यासाठी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी नेत्यांना झुगारून मोठ्या हिमतीने बीड ते मंत्रालय पर्यंत लॉर्ग मार्च काढला आहे. या लाँग मार्चला समर्थन म्हणून आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा ने कंबर कसली आहे.

आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा पक्षाने मोठ्या ताकदीने पुणे पासून या लॉर्ग मार्च मध्ये हजारो महिला पुरुष कार्यकर्त्यांना सोबत घेऊन सामिल होणार आहे. अशी घोषणा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी संभाजी नगर येथून घोषणा केली आहे.

लाँग मार्च मध्ये मराठवाडा, कोकण, खानदेश, विदर्भ आणि मुंबई प्रदेश चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सामील होणार आहेत. याची पुर्व तयारी मराठवाडा प्रदेश अध्यक्ष बापु सैय्यद अली यांनी केली असून पुणे येथे लॉर्ग मार्च मध्ये येणाऱ्या भिम सैनिकांच्या स्वागताची जय्यत तयारी आंबेडकरी महिला मोर्चा अध्यक्षा कविता गाडगे यांनी केली कार्यकर्त्यांची जेवण्याची, राहण्याची व्यवस्था केली आहे.

पुणे येथील पक्षाचे शहरं जिल्हा अध्यक्ष पदाधिकारी सागर वानखेडे, लक्ष्मी वानखेडे, नरेश लोट, कमलाकर गायकवाड, सुनंदा कांबळे, अनुजा पाटील, उषा गायकवाड सह कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत असे संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत सोनवणे यांनी सांगितले.

# नागपूर मनपाची शहरभर अतिक्रमणविरोधी धडक मोहीम ; ठेले, साहित्य जप्त, कारवाई सुरूच

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर महानगरपालिका प्रवर्तन विभागाने शहरातील प्रमुख व्यापारी व गर्दीच्या भागांमध्ये अतिक्रमण निर्मूलनासाठी व्यापक मोहीम राबवित धडक कारवाई केली. सीताबर्डी, शनीचरा मार्केट, महाल, बडकस चौक आणि आसपासच्या परिसरात विविध पथकांमार्फत दिवसभर अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. रस्ते व फुटपाथवरील अवैध ठेले, दुकाने आणि साहित्य हटवून मोठ्या प्रमाणात जप्ती करण्यात आली.

प्रवर्तन विभागाच्या अंतर्गत पथक क्रमांक 04 व 05 यांनी संयुक्तपणे सीताबर्डी परिसरात कारवाई केली. सीताबर्डी मेन रोड ते व्हेरायटी चौक आणि तेथून पुन्हा सीताबर्डी मेन रोडपर्यंत संपूर्ण दिवस अतिक्रमण हटविण्याचे काम सुरू होते. या दरम्यान



रस्त्यांच्या दोन्ही बाजूंवरील तसेच फुटपाथवरील अवैध ठेले व दुकाने हटविण्यात आली. कारवाईदरम्यान बॅग आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान, अंतर्गत पथक क्रमांक 03 ने शनीचरा मार्केट आणि राजवाडा पॅलेस परिसरात अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबविली. या भागातील रस्ते व फुटपाथवरील अनधिकृत व्यवसाय हटवून वाहतुकीसाठी मोकळी जागा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला. दिवसभर सुरू असलेल्या या मोहिमेत अनेक अतिक्रमणे हटविण्यात आली.

महाल परिसरात अंतर्गत पथक क्रमांक 01 व 02 यांनी संयुक्तरित्या विशेष मोहीम हाती घेतली. महाल चौक, बडकस चौक, शिवाजी पुतळा, केडीबाग रोड, गडकरी वाडा परिसर, कल्याणेश्वर मंदिर परिसर आदी भागांमध्ये अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईत अंदाजे एक ट्रकभर साहित्य जप्त करण्यात आले असून त्यामध्ये चार ठेले तसेच इतर विविध साहित्याचा समावेश आहे. संबंधित भागांतील रस्ते व फुटपाथ अतिक्रमणमुक्त करण्यासाठी कारवाई सुरूच ठेवण्यात आली आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या या व्यापक अतिक्रमणविरोधी मोहिमेमुळे शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा आणि पादचारी मार्ग मोकळे होण्यास मदत होत असून नागरिकांना वाहतूक व पायी चालण्यासाठी अधिक सुविधा उपलब्ध होत आहेत.\ही कारवाई प्रवर्तन विभागाचे उपायुक्त मंगेश खवले आणि सहायक आयुक्त संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलन पथकाने केली. मनपाने पुढील काळातही अशाच प्रकारच्या नियमित मोहिमा सुरू ठेवण्याचा इशारा अतिक्रमणधारकांना दिला आहे.

# शिक्कामोर्तब' नाटकाच्या माध्यमातून लोकप्रिय अभिनेते 'कांचन पगारे' मजनू या 'बंगाली' भूमिकेतून उडवणार हास्याचे फवारे!

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (केतन भोज)** : हिंदी आणि मराठी मनोरंजन विश्वात, तसेच छोट्या पडद्यापासून ते मोठ्या पडद्यापर्यंत आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे अष्टपैलू अभिनेते कांचन पगारे आता एका नव्या दमाने रंगभूमीवर परतले आहेत. 'तरंगिणी एंटरटेनमेंट' आणि 'नवनीत' निर्मित, तसेच प्रमोद शेलार लिखित व दिग्दर्शित 'शिक्कामोर्तब' या नव्याकोऱ्या नाटकातून ते रसिक प्रेक्षकांना आपल्या प्रतिभेची एक वेगळीच जादू दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. नाटक ही कलाकाराच्या अभिनय क्षमतेची खरी कसोटी मानली जाते. प्रसिद्धीपेक्षा कलेवरील निष्ठा आणि अभिनयातील प्रामाणिकपणा जपत, रंगभूमीशी पुन्हा घट्ट नाते जोडण्याचा कांचन पगारे यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. 'शिक्कामोर्तब' या नाटकात त्यांनी एका मजनू ह्या 'बंगाली' माणसाची अत्यंत अफलातून आणि आव्हानात्मक भूमिका लीलया साकारली आहे. बंगाली धाटणीच्या मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी आणि त्या भूमिकेची योग्य पकड घेण्यासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत नाटकाच्या सादरीकरणात स्पष्टपणे दिसून येते. मजनू या पात्रात स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन ते जिवंत




करण्याची त्यांची शैली वाखाणण्याजोगी आहे. विनोदी प्रसंग असोत किंवा भावूक क्षण, त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकपणा प्रेक्षकांना भारावून टाकतो. या नाटकात कांचन पगारे यांच्यासह सागर कारंडे, स्नेहा पराडकर आणि भक्ती रत्नपारखी या दिग्गज कलाकारांची दमदार फळी आहे. विशेषतः रंगमंचावर सागर कारंडे आणि कांचन पगारे यांची अभिनयातील 'केमिस्ट्री' आणि जुगलबंदी संपूर्ण नाटकात भाव खाऊन जाते. त्यांना स्नेहा पराडकर यांच्या करारी 'वकिली'ची आणि भक्ती रत्नपारखी यांच्या 'लैला' या पात्राची उत्तम साथ लाभली आहे.एका जोडप्याच्या आयुष्यात अचानक आलेल्या दुसऱ्या जोडप्यामुळे निर्माण होणारा गोंधळ आणि त्यातून नात्यांवर अधिकृतरीत्या 'शिक्कामोर्तब' करणे किती गरजेचे असते, हा विषय अत्यंत खुमासदार विनोदी शैलीत मांडून प्रेक्षकांना विचार करण्यास भाग पाडण्यात दिग्दर्शक यशस्वी ठरले आहेत. कांचन पगारे आणि इतर कलाकारांच्या दमदार अभिनयाला तांत्रिक बाजूची उत्तम जोड मिळाली आहे. नेपथ्यकार संदेश बेंद्रे यांनी उभारलेले आलिशान घर, शीतल तळपदे यांची मोहवून टाकणारी प्रकाशयोजना आणि अभिजित पेंढारकर यांच्या सुमधुर संगीतामुळे नाटकाची रंगत अधिकच खुलते.

नाटकाचे निर्मिती प्रमुख म्हणून महेंद्र खराडे उत्तम जबाबदारी सांभाळत आहेत. अभिनयाचा हा निखळ आनंद अनुभवण्यासाठी आणि कांचन पगारे यांच्या या नव्या व प्रेरणादायी नाट्यप्रवासाचे साक्षीदार होण्यासाठी रसिक नक्कीच आतुर असतील. या नवीन नाट्यकृतीसाठी कांचन पगारे आणि त्यांच्या संपूर्ण टीमला मनापासून शुभेच्छा. ही कलाकृती नक्कीच यशाची शिखरे गाठेल आणि रसिक प्रेक्षक आपल्या प्रेमाचा 'शिक्का' या नाटकावर नक्कीच उमटवतील, अशी नटेश्वर चरणी प्रार्थना!

# दुचाकी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास कामोठे पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी** : खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमधून दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे.चेतन कातकर (34) असे त्याचे नाव असून, त्याने कामोठे व कळंबोली पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील केलेले एकूण चार वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यातील एक दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्याच्याकडून आणखी काही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

निहार पाल (23) या तरुणाने खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये त्याची दुचाकी पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. निहार सायंकाळी परत आल्यानंतर त्याला दुचाकी चोरीस गेल्याचे निदर्शनास आले होते.

त्यावर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर पो.नि. मनोहर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. गणेश दळवी, पीएसआय प्रतापसिंह चव्हाण, पो.हवा.संजय झोळ, प्रशांत जाधव, कुणाल म्हात्रे, पो.ना.सचिन ठोंबरे, पो.शि.दत्ता जाधव, राजेंद्र इलग, प्रमोद कोकाटे व त्यांच्या पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यात त्यांना आढळलेला संशयिताचा फोटो त्यांनी येथील गॅरेज चालक, पार्किंग कर्मचारी व इतरांना दाखवण्यात आला होता. त्याच्या चार दिवसांनंतर तो पुन्हा खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या पार्किंग परिसरात आल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव चेतन कातकर असून, तो मुंबईतील वडाळा पश्चिम येथील गणेश नगर परिसरात राहत असल्याचे सांगितले. तसेच त्याने वाहनचोरीचे आणखी गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली.

त्यात कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत 3 व कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत 1, असे 4 गुन्हे केल्याचे सांगितले.

त्यावर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त केली आहे.

# लायन्स सरगमचा पदग्रहण सोहळा थाटात संपन्न ; अध्यक्षपदी आदित्य दोशी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** लायन्स क्लब ऑफ पनवेलने गेल्या तीन वर्षात जे उत्कृष्ट कार्य केले आहे ते फारच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन संतोष शेट्टी यांनी, गोखले सभागृह पनवेल येथे झालेल्या सरगम लायन्स क्लबच्या नवीन पदग्रहण सोहळ्यात मुख्य अतिथी म्हणुन बोलताना केले.यावेळी व्यासपीठावर संतोष शेट्टी यांच्यासोबत विशेष अतिथी विजय गणात्रा, रिजन चेअरमन अल्केश शहा , झोन चेअरमन, नारायण कट्टी हे होते.

या कार्यक्रमात सरगम क्लबचे सन 2026-27 चे अध्यक्ष म्हणुन आदित्य दोशी यांनी पदभार स्वीकारला. सरगम क्लबचे मावळते अध्यक्ष प्रेमेंद्र बहिरा यांनी उपस्थितांचे स्वागत करुन गेल्यावर्षी केलेल्या कामाचा आढावा



घेतला आणि मल्टिपल डिस्ट्रिक्ट तर्फे क्लबला विविध पारितोषिकांनी सन्मानित केल्याचे सांगितले. प्रेमेंद्र बहिरा यांच्यातर्फे गतवर्षी त्यांना सहकार्य केलेल्या सभासदांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात सरगम क्लबमध्ये नवीन सभासद झालेल्या ॲड. सुरेखा भुजबळ, गीतेश नवधरे, किरण पाटील यांना विशेष अतिथी प्रथम प्रांतपाल विजय गणात्रा यांनी सभासदत्वाची शपथ दिली. नवनिर्वाचित अध्यक्ष आदित्य दोशी यांनी अध्यक्ष म्हणुन काम करण्याची संधी दिल्याबद्दल सरगम क्लबच्या सर्व सभासदांचे आभार मानले आणि यावर्षी सुद्धा विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करुन सरगम क्लबची परंपरा पुढे नेणार असल्याचे सांगितले. आदित्य दोशी यांनी आपल्या कारकिर्दीचा पहिले उपक्रम म्हणुन साई आश्रय वृद्धाश्रम येथे 1 महिन्याला लागणारे किराणा सामान देण्यात आले तसेच एका गरजु महिलेला शिलाई मशीन देण्यात आले. याचवेळी मुख्य अतिथी संतोष शेट्टी यांनी नवनिर्वाचित सचिव मानदा पंडित, खजिनदार अनिल परमार, सहसचिव सुषमा पन्हाळे, सहखजिनदार मिलिंद जोशी, उपाध्यक्ष संध्या महानुभाव, जयेश मणियार, टेमर मोहिनी जोशी, टेलट्विस्टर महेंद्र लोहार आणि संचालक म्हणुन संजय गोडसे, स्वाती गोडसे, अल्केश शहा, राजेंद्र महानुभाव, धवल शहा यांना त्यांच्या पदाची शपथ दिली. विजय गणात्रा यांचा परिचय राजेंद्र महानुभाव तर संतोष शेट्टी यांचा परिचय संजय गोडसे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन स्वाती गोडसे यांनी केले. या कार्यक्रमाला डिस्ट्रिक्ट पदाधिकारी सत्यपाल चुघ, अनुप थरवाणी, अनिल म्हात्रे,सुयोग पेंडसे, सुरभी पेंडसे, उलवे क्लबचे मिलिंद पाटील, उमेश जाधव, द्रोणगिरी क्लबचे मोनिका चौकर, सागर चौकर, लिओ काळसेकर चे अली खान आणि सभासद, ओंकार खेडकर, अंकिता म्हात्रे तसेच पनवेल आणि परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकीचे नुतनीकरण पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात येणार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहर पोलीस ठाणे अंतर्गत असलेल्या पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसराचे सुशोभीकरण करून चौकी नव्याने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने पनवेल महानगरपालिकेचे विद्यमान नगरसेवक यांचेसोबत आज संयुक्त पाहणी करण्यात आली. बीट चौकीच्या पाहणीनंतर उपस्थित पनवेल महानगरपालिका व स्थानिक नगरसेवक मिळून चौकीचे व परिसराचे नूतनीकरणाचे काम येत्या काही दिवसात सुरू करण्याचे आश्वासन दिले



आहे.

दरम्यान कायदा व सुव्यवस्था तसेच वाहतूक कोंडीच्या दृष्टीने पनवेल रेल्वे स्टेशन परिसराची देखील पाहणी करण्यात आली आहे. पनवेल रेल्वे स्टेशन बीट चौकी व परिसर पाहणीकरिता वपोनि नितीन ठाकरे, गोपनीय विभागाचे अधिकारी शैलेश जाधव, तसेच पनवेल महानगरपालिका विद्यमान नगरसेवक ॲड.मनोज भुजबळ, श्रीमती.शिवानी घरत, श्रीमती.प्रियंका कांडपिळे, श्रीमती.अस्मिता घरत, माजी नगरसेवक सुनील बहिरा, तेजस कांडपिळे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम हे उपस्थित होते. यावेळी परिसरातील पूर्ण पाहणी करून आवश्यक त्या उपाय योजना करण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले.

> **याबाबत आम्ही पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, मा.सभागृह नेते परेश ठाकूर यांना या विभागातील सात नगरसेवकांचे पत्र देवून या चौकीचे नुतनीकरण पनवेल महा नगरपालिकेच्या माध्यमातून लवकरात लवकर करून घेण्यासाठी पाठपुरावा करू**
>
> **ॲड.मनोज भुजबळ, नगरसेवक**

# रजत राऊत यांना जिल्हास्तरीय युवा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी :** अड्याळ येथे सध्या वास्तव्यात असलेले रजत राऊत यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. यात रजत राऊत यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल जिल्हा युवा पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रजत राऊत यांनी पहेला येथे मुला मुलींच्या बौद्धिक विकासाकरिता अभ्यासिका सुरू केली असून त्यात बरेच विद्यार्थी /विद्यार्थिनी विविध जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करीत आहेत. त्याचप्रमाणे यापूर्वी त्यांनी कुही तालुक्यातील मालची बानोर येथे घर उध्वस्त झालेल्या बोरकर परिवाराला अनाज व किराणा साहित्याची थोडीफार मदत केली होती. तसेच कुही तालुक्यातील मसली बौद्ध विहाराला धम्मदान वस्तू स्वरूपात दान देण्याचे त्यांनी ठरविले आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल कृपा ढवळे ,सोपान खोब्रागडे व त्यांच्या मित्र परिवारांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे, ब्लू स्टार टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

# नागपूर मध्यवर्ती कारागृह अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी सर्व रोग निदान व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपुर** : मा. श्री. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे व श्री. वैभव सु. आगे, अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह तथा कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली नागपूर मध्यवर्ती कारागृहातील अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी शालिनीताई मेघे हॉस्पीटल, हिंगणा रोड, नागपूर यांच्या सहकार्याने मोफत सर्व रोग निदान व आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन मंगलमूर्ती लॉन, कारागृह वसाहत परिसर, नागपूर येथे करण्यात आले.

सदर आरोग्य तपासणी शिबीरामध्ये Eye Chek-up, Blood Pressure Monitoring, Blood Sugar Test-




ing, ECG, Bone Mineral Density, Mammography इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. तसेच General Medicine, OBGY, Orthopedic, ENT, Psychiatrist, Opthalmologist या विषयाचे तज्ञ वैद्यकिय अधिकारी यांनी तपासणी करुन औषधोपचाराबाबत सल्ला दिला. कारागृह अधिकारी व कर्मचारी यांची सेवा अत्यावक्षक सेवा असल्याने तसेच आवश्यकतेपेक्षा अधिकारी व कर्मचारी यांची संख्याबळ कमी असल्याने त्यांना पाहिजे त्या प्रमाणात वेळ मिळत नाही व कुटुंबालाही वेळ देवू शकत नाही. त्यामुळे कारागृहीन कर्तव्य पार पाडतांना त्यांचे व कुटुंबाचे आरोग्य सदृढ राहावे याकरीता सदर आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.सदर कार्यक्रमा सोबतच नागपूर मध्यवर्ती कारागृहातील बंदयांच्या उपचारासाठी रोटरी क्लब ऑफ नॉर्थ, नागपूर यांचे मार्फत बी.पी. ऑपरेटर, स्टेथेस्कोप, थर्मामीटर, ईम्फ्रारेड लॅम्प, फोरसेफ टुथ/प्लेन, ग्लूकोमीटर, अर्थो हॅमर, पल्स ऑक्सीमीटर, आयव्ही सेट इत्यादी वैद्यकिय साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले.

सदर कार्यक्रमाकरीता श्री. वैभव सु. आगे, अधीक्षक, श्रीमती दिपा आगे, अति. अधीक्षक, डॉ. रामेश्वर कोकुर्डे, मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री. मनोहर भोसले, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, श्री. वामन निमजे, तुरुंगाधिकारी श्रेणी-1, रोटरी कल्ब ऑफ नार्थ नागपूर चे अध्यक्ष श्री. विनीत दारा, सचिव श्री. स्वप्नील बंड, वैद्यकिय संचालक श्री. शाम वाधवानी तसेच शालीनीताई मेघे हॉस्पीटल नागपूरचे ओ.एस.डी. डॉ. अश्वीन रडके तसेच वैद्यकिय अधिकारी डॉ. प्रदीप पाटील, डॉ. दत्ता जुडे, डॉ. विनित राठोड, डॉ. तन्वी प्रोस्थो, डॉ. तेजस, प्रयास सामाजिक कार्यकर्ता श्री. धनपाल मेश्राम, श्रीमती मिना लाटकर तसेच कारागृह अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयाचा अमोल खंडिझोंड याची फ्रान्स मध्ये होणाऱ्या मार्शल आर्ट च्या वर्ल्ड चॅम्पियनशिप साठी निवड

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिल्या शुभेच्छा**



**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : दिनांक 14 जून 2026 रविवार रोजी लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांची विशेष भेट घेण्यात आली सदर भेटीसाठी माजी महापौर सीता ताई पाटील यादेखील स्वतः उपस्थित होत्या. सदर भेटीचे मुख्य उद्देश म्हणजे सिकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर मार्शल आर्ट ॲक्टिव्हिटी करणारे प्रशिक्षक श्री भूपेंद्र गायकवाड व त्यांचा शिष्य टिकेटी महाविद्यालय एस वाय बी कॉम मध्ये शिकणारा आदित्य अमोल खंडिझोड याने 28 एप्रिल ते पाच मे 2026 रोजी काठमांडू नेपाळ येथे एशियन चॅम्पियनशिप मध्ये विजय प्राप्त केल्यानंतर याची 9 सप्टेंबर ते 12 सप्टेंबर 2026 रोजी फ्रान्समध्ये होणाऱ्या सर्वात वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये निवड झालेली आहे त्याबद्दल माननीय श्री लोकनेते रामशेठ ठाकूर साहेबांनी विजयी खेळाडूंना भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद दिले

# जेएनपीए मधील जेएसडब्लू जेट्टीवर स्फोट; दोघांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जेएनपीटीच्या जेएसडब्लू ऑइल जेट्टीवर आज सकाळी तेलवाहिनी पिगिंगचे काम सुरू असताना BPCL जेटीवर ग्रॅसचा स्फोट होऊन दोन कामगारांचा जागीच मृत्यू झाला. करावली, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथील रहिवासी राजेंद्र शिंदे, गणेश बेन्झोप्लास्ट कंपनीचे अधिकारी, आणि उरण तालुक्यातील पिरकोन येथील गजानन गावंड, कंत्राटी कामगार, यांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला. हा अपघात आज सकाळी 9 वाजण्याच्या सुमारास घडला. दोन्ही मृतदेह उरण येथील इंदिरा गांधी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. घटनेनंतर स्थानिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. पिगिंगसारखे अत्यंत धोकादायक काम सुरू असताना GBL कंपनी आणि संबंधित ठेकेदाराने सुरक्षेचे कोणतेही नियम पाळले नसल्याचा आरोप कामगार संघटनांनी केला आहे. हेल्मेट, परमिट टू वर्क, सेफ्टी ऑडिट, गॅस टेस्टिंग यासारख्या मूलभूत सुरक्षा उपायांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने हा स्फोट झाल्याचे कामगारांचे म्हणणे आहे. "GBL कंपनी आणि ठेकेदाराला कामगारांच्या जीवाची किंमतच नाही. फक्त उत्पादन आणि नफा हेच त्यांचे उद्दिष्ट आहे," अशी टीका संघटनांनी केली आहे.

अपघाताची तीव्रतालक्षात घेता गुन्हात्वरित दाखल करणे अपेक्षित होते. GBL कंपनी आणि ठेकेदार यांच्यात 'जुळवाजुळव' झाल्याची चर्चा उरणमध्ये सुरू आहे. या प्रकरणात 'सेटलमेंट' करून फाईल बंद केली जाईल की काय, अशी भीती पीडित कुटुंबीय आणि स्थानिक व्यक्त करत आहेत. जेएनपीटी प्रशासनाने या घटनेची चौकशी सुरू केली असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, चौकशीच्या नावाखाली वेळकाढूपणा करून दोषी GBL कंपनी आणि ठेकेदाराला वाचवले जाणार का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या दुर्घटनेमुळे जेट्टीवरील काम तात्पुरते थांबवण्यात आले आहे. परंतु, "काम थांबवून काय उपयोग? दोषींवर गुन्हा कधी दाखल होणारका ?की तपासाची फाईल बंद होणार याबाबत जनतेचे मध्ये उलटसुलट चर्चा सुरु आहे

# शिवसेने (शिंदे गट) च्या मागणीला यश ; अग्रवाल विद्यामंदिरासमोर झाली बस स्थानकाची व्यवस्था

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे प्रतिनिधी** : मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत को.ए.सो. च्या अग्रवाल विद्यामंदिरासमोर विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी एस.टी. बस स्थानकाची मागणी शिवसेने(शिंदे गट) च्या वतीने विभाग संघटक दिनेश घाग यांनी नोव्हेंबर मध्ये राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व एस.टी परिवहन यांच्याकडे केली होती. त्या मागणीला यश आले असून सदरील ठिकाणी बस स्थानकाची व्यवस्था करण्यात आली. त्याची पहाणी जि.प.सदस्य सुमित काते, विभागीय संघटक दिनेश घाग यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आली. यावेळी पत्राची तातडीने दखल घेत बस स्थानक दिल्याबद्दल नागोठणे विभाग संघटक दिनेश घाग यांनी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व एस.टी परिवहनचे आभार मानले.यावेळी शिवसेना (उ.बा.ठा) शहर संघटक

**सुमित काते व दिनेश घाग यांनी केली पहाणी**



बाळू रटाटे, शिंदे गटाचे शहर अध्यक्ष संतोष चितळकर,युवक अध्यक्ष संदीप वाजे यांच्यासह पांडुरंग कामथे.सुरेश जोशी,भूपेंद्र बामणे,जलील शिंदी,दिलीप धाडसे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.नागोठणे येथील बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलनातील अग्रवाल विद्यामंदिर व प्रधान महाविद्यालय हे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असून त्या ठिकाणी तालुका तसेच विभागातील विविध ठिकाणाहून साधारण 2000 ते 2500 विद्यार्थी शिक्षण घेत असून 70 ते 80 शिक्षक व कर्मचारी सेवेत आहेत. या सर्वांना नागोठणे एस.टी. स्थानकातून प्रवास करावा लागतो. सदरील एस.टी. स्थानक शाळेपासून बऱ्याच अंतरावर असल्याने या सर्वांचा वेळ वाया जात असून त्रासही सहन करावा असतो. तसेच विद्यार्थ्यां प्रमाणेच डोंगर माथ्यावरील असंख्ये आदिवासी वाड्या,जोगेश्वरीनगर तसेच परिसरतील नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी महामार्गावर शाळेसमोर वाकण कडे जाण्यासाठी व हॉटेल रुची येथे रोहा,अलिबाग व पेणकडे जाण्यासाठी बसस्थानक बांधण्याची मागणीचे एक निवेदन शिवसेनेच्यावतीने पनवेल येथील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, व्यवस्थापक तसेच रामवाडी येथील एस.टी परिवहन कार्यालय व्यवस्थापक प्रमुख यांना 21 नोव्हेंबर रोजी विभागीय संघटक दिनेश घाग व युवासेना अध्यक्ष संदीप वाजे आम्ही प्रत्यक्ष भेट घेऊन देण्यात आला. सदरील मागणीला यश येऊन त्या ठिकाणी बस स्थानकाची व्यवस्था करण्यात आल्याबद्दल दिनेश घाग यांनी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण व एस.टी परिवहनचे आभार मानले.

# मान्सूनची 'वेटिंग' वाढली! रायगडात पेरण्या ठप्प; अलिबाग-मुरुडमधील शेतकरी हवालदिल

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : हवामान खात्याने मान्सून १० जूनपर्यंत मुंबई परिसरात दाखल होईल, असा अंदाज वर्तविला होता. मात्र १४ जून उलटूनही रायगड जिल्ह्यासह उत्तर कोकणातील अनेक भागांमध्ये मान्सूनचा समाधानकारक पाऊस अद्याप पोहोचलेला नसल्याने शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाची चिंता वाढली आहे. आकाशात काळे ढग दाटून येतात, विजांचा कडकडाट होतो, पावसाची चाहूल लागते; मात्र काही क्षणांतच ढग विरून पुन्हा कडक उन्हाचा तडाखा सुरू होत असल्याने रायगडकरांची प्रतीक्षा अधिकच लांबत चालली आहे.

यंदा देशात मान्सूनचे आगमन वेळेवर झाले. केरळ किनारपट्टीवर दाखल झाल्यानंतर मान्सूनने सिंधुदुर्गपर्यंतही वेळेत मजल मारली. मात्र त्यानंतर त्याच्या वाटचालीचा वेग मंदावला असून मान्सून सध्या रत्नागिरी परिसरातच रेंगाळल्याचे चित्र आहे. परिणामी रायगड जिल्हा अद्यापही मान्सूनच्या मुख्य प्रवाहापासून दूर असून पावसाच्या प्रतीक्षेत आहे.

**भातपट्ट्यात वाढली धाकधूक**

रायगड हा कोकणातील प्रमुख भात उत्पादक जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील हजारो शेतकरी पूर्णपणे मान्सूनवर अवलंबून आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात पावसाची सुरुवात होताच नांगरणी, रोपवाटिका आणि पेरणीच्या कामांना वेग येतो. मात्र यंदा शेतकऱ्यांनी पूर्वतयारी पूर्ण करूनही पावसाअभावी प्रत्यक्ष पेरणी सुरू करता आलेली नाही.

अनेक शेतकऱ्यांनी बियाणे, खते आणि शेतीसाठी लागणारे साहित्य खरेदी करून ठेवले आहे. मात्र जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने शेतीची कामे रखडली आहेत. पाऊस आणखी काही दिवस लांबल्यास भात लागवडीचे वेळापत्रक कोलमडण्याची शक्यता असून उत्पादनावरही त्याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

**अलिबाग-मुरुडमधील शेतकरीही चिंतेत**

अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील शेतकरीही सध्या पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. या भागात भात हे प्रमुख पीक असून जूनच्या पहिल्या आठवड्यापासून शेतात लगबग सुरू होणे अपेक्षित असते. रेवदंडा, चौल, नागाव, सासवणे, मुरुड, बोर्ली, राजपुरी आणि परिसरातील शेतकऱ्यांनी शेतांची मशागत, बांधबंदिस्ती आणि बियाण्यांची तयारी पूर्ण केली आहे. काही भागात मान्सूनपूर्व सरींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले होते; मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारल्याने जमिनी कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील शेतकरीही चिंताग्रस्त झाले असून त्यांचे लक्ष आता आकाशाकडे लागले आहे.

**उकाड्याने नागरिक हैराण**

गेल्या काही दिवसांपासून रायगड जिल्ह्यात ढगाळ वातावरण निर्माण होत असले तरी अपेक्षित पाऊस पडत नाही. त्यामुळे वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दिवसभर कडक ऊन आणि रात्रीचा असह्य उकाडा यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. दुपारच्या वेळेत रस्त्यांवरील वर्दळ कमी होत असून अनेक ठिकाणी नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत आहे.

मान्सूनपूर्व सरींनी दिला होता दिलासा. काही दिवसांपूर्वी पोलादपूर, महाड, माणगाव, रोहा, तळा, म्हसळा आणि श्रीवर्धन तालुक्यांमध्ये मान्सूनपूर्व सरींनी हजेरी लावली होती. या सरींमुळे शेतकऱ्यांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले होते. मान्सून आता काही दिवसांत दाखल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र त्यानंतर पावसाने पुन्हा विश्रांती घेतल्याने शेतकरी वर्गात निराशा पसरली आहे.

**पाणीटंचाईचे संकट अधिक गडद**

मान्सून लांबल्याने जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकटही गंभीर बनत चालले आहे. अनेक धरणे, तलाव, विहिरी आणि बंधाऱ्यांतील जलसाठा कमी झाला आहे. ग्रामीण भागातील अनेक गावे आजही टँकरच्या पाण्यावर अवलंबून आहेत. काही भागांत महिलांना आणि ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत आहे. पावसाचा प्रत्येक दिवस उशिरा होत असल्याने टंचाईची तीव्रता वाढत चालली आहे.

**हवामान खात्याकडून आशेचा किरण**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसांत मान्सूनच्या वाटचालीस पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील हवामान प्रणाली सक्रिय झाल्यास मान्सून पुन्हा वेग घेऊ शकतो. त्यामुळे रायगड जिल्ह्यात लवकरच मान्सून दाखल होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

तोपर्यंत मात्र शेतकरी, नागरिक आणि प्रशासनाचे लक्ष आकाशाकडेच लागून राहणार आहे. एकीकडे पेरणीच्या प्रतीक्षेत शेतकरी शेताच्या बांधावर उभा आहे, तर दुसरीकडे पाण्याच्या टंचाईने त्रस्त नागरिक काळ्या ढगांकडे आशेने पाहत आहेत. मान्सूनची चाहूल लागली असली तरी रायगडकरांच्या अंगणात त्याचे आगमन अद्याप बाकीच आहे.

## डॉ भीमराव आंबेडकर रामजी आंबेडकर सत्कार सोहळा २०२६

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत दक्षिण नागपूर** : संध्या राजूरकर, बहुजन सौरभ, नरेश धोपटे धम्म संतोषी, मनीषनगरडॉ शंकर खोब्रागडे, आंबेडकर मिशन, नवनकाशा आणि बरेच सन्माननीय यांचा डॉ भीमराव आंबेडकर रामजी आंबेडकर पुरस्कार देऊन माननीय उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती येनशिवराज खोब्रागडे आणि पत्नी जयश्री खोब्रागडे यांच्या हस्ते सत्कार.ई.झेड.खोब्रागडे, IAS, रेखा खोब्रागडे, अध्यक्ष ई.झेड. सविंधान फाउंडेशन नागपूर आणि

प्रताप वाघमारे, एसडीओ, वर्धा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम अमेय सभागृह, विदर्भ साहित्य संघ, बर्डी, नागपूर १३ जुन २०२६ ला संध्याकाळी ४-७ वाजता वाजता आयोजित करण्यात आला होता. ह्यानिमित नागपूर



आणि इतर सामाजिक संस्था आणि कार्यकर्ता २०२४ , २०२५ ह्या दोन वर्षा तील मान्यवरांचा यांचा मानचिन्ह आणि मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ह्याप्रसंगी डॉ सुनील भगत , देवयानी भगत, सुषमा शेवाडे, सुमेर शेवाडे , वंदना मेंढे, रवी सहारे, प्रतिभा सहारे, सुनीता रामटेके, नरेस धोपटे, श्रीराम बनसोड, मिलिंद जाधव, डॉ. जयराम खोब्रागडे , श्री पुणेकर आणि २०० च्या वर मान्यवर मंडळी उपस्थित होती.

## मुरुड नगरपरिषदेचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित; जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पुन्हा स्मरणपत्र

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रूपांतर करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर न झाल्याने जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागांना पुन्हा एकदा स्मरणपत्र पाठवून आवश्यक माहिती तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.मुरुड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रूपांतर करण्याच्या प्रस्तावासंदर्भात जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड यांनी सुमारे दीड महिन्यांपूर्वी आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत नगररचना विभाग, जिल्हा परिषद, महसूल प्रशासन तसेच ग्रामपंचायत स्तरावरील संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. बैठकीदरम्यान नगरपरिषदेसाठी आवश्यक माहिती संकलित करून परिपूर्ण प्रस्ताव अल्पावधीत सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

यानंतर २२ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा प्रशासनाकडून विविध विभागांना पत्र पाठवून लोकसंख्या, अकृषिक रोजगाराचे प्रमाण, ग्रामपंचायतीचा ठराव, औद्योगिक क्षेत्राची माहिती, प्रस्तावित हद्दीचा नकाशा, आर्थिक उत्पन्न, दरडोई उत्पन्न तसेच नगररचना विभागाचा अभिप्राय यांसह विविध बाबींची माहिती मागविण्यात आली होती.

शासन स्तरावरून या प्रस्तावाबाबत सातत्याने विचारणा होत असल्याने आवश्यक माहिती वेळेत सादर करण्याच्या सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या होत्या. मात्र, अद्याप सर्व माहिती एकत्रित होऊन परिपूर्ण प्रस्ताव सादर झालेला नसल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, २ जून २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपरिषद प्रशासन विभागाने पुन्हा स्मरणपत्र जारी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक माहिती लवकरात लवकर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.मुरुड ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रूपांतर करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तावाच्या प्रक्रियेला गती मिळावी, अशी अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. आता आवश्यक कागदपत्रे व माहिती पूर्ण झाल्यानंतर प्रस्ताव शासनाकडे कधी पाठविला जातो, याकडे मुरुडकरांचे लक्ष लागले आहे.

## सागवान तोडणीस विनापरवाना मुभा नको; वनमंत्र्यांकडे स्थगितीची मागणी

### पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांचा ईमेलद्वारे पत्रव्यवहार

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : राज्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालकी क्षेत्रातील सागवान वृक्ष तोडण्यास व वाहतुकीस शासनाच्या वनविभागाच्या परवानगीची (ट्रान्झिट पास) आवश्यकता नाही, असा निर्णय काल शनिवारी वनविभागाच्या वतीने घेण्यात आला. मात्र, शासनाच्या या निर्णयाबद्दल राज्यातील पर्यावरणप्रेमी, सुजाण नागरिक, पर्यावरण अभ्यासक व खुद्द वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी हेही नाराज झाले आहेत. या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेत सिल्लोड येथील पर्यावरण अभ्यासक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह आणि अभिनव प्रतिष्ठान या सामाजिक



संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना काल ईमेलद्वारे पत्रव्यवहार करून या विषयाचे गांभीर्य कळवले आहे.

डॉ. पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात सध्या विविध प्रकल्प, रस्ते काम, सोलर प्रोजेक्ट या कामी व तस्करीच्या माध्यमातून प्रचंड प्रमाणात वृक्षतोड होत आहे. राज्यामध्ये निसर्ग संतुलनासाठी ३३ टक्के वनक्षेत्र अपेक्षित आहे, मात्र ते फक्त नऊ ते दहा टक्के इतकेच आहे. २०२६ चा उन्हाळा हा या शतकातील सर्वाधिक लांबीचा व तापदायी उन्हाळा ठरला आहे. सोबत जागतिक तापमान वाढ, हरितगृह वायूंचे प्रचंड वाढलेले प्रमाण व प्रदूषण या सर्व बाबींचा परिणाम 'अल-निनो'सारख्या घातक समस्येस वाढवत आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या मालकीतील सागवान झाड तोडण्यास व वाहतुकीस विनाअट परवानगी दिल्यास, त्या गोष्टीचा गैरफायदा लाकूड तस्कर घेतील. राखीव वन क्षेत्रातील जंगलातील सागवान तस्कर हे 'आम्ही शेतकरी आहोत' असे भासवून निसर्गातील सर्व साग संपवून टाकतील. आधीच आपल्या राज्यातील मौल्यवान वनसंपदा प्रचंड कमी झाली आहे. जंगलातील, डोंगरातील साग व इतर वृक्ष कमी झाल्याने याचा परिणाम पर्जन्यमान कमी होणे आणि वन्यजीवांचा अधिवास धोक्यात येणे यावर होईल.वातावरणातील उष्णता व कार्बन डायऑक्साइडसारखे प्रदूषके शोषण्याचे कार्य सागासहित सर्व वृक्ष करतात. सध्या राज्यावर 'अल-निनो' व दुष्काळाचे सावट आहे. तसेच, शेतकऱ्यांच्या मालकी क्षेत्रातील सागाची झाडे चोरटे व लाकूड तस्कर बिनदिक्कत चोरून नेतील आणि शेतकऱ्यांच्या हातात काहीही पडणार नाही, असे डॉ. संतोष पाटील यांनी पत्रात विशद केले आहे.

## मुख्याध्यापक श्री.दिपक बडगुजर यांना राष्ट्रीय कार्य दर्पण पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी** : नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय शाळा क्रमांक ११३ महापे शाळेचे मुख्याध्यापक तथा नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा नियंत्रक समन्वयक श्री.दिपक बडगुजर सर यांना मराठी पत्रकार संघ सभागृह , आझाद मैदान , मुंबई येथे आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त सुनील अगवणे व वेसुची पारू गीतकार वेसवकर यांच्या हस्ते आणि विशेष अधीक्षक जलसंपदा विभाग डॉ. जे.के .महाडिक महाराष्ट्र शासन, कर्करोग शास्त्रज्ञ तथा विश्वशांतीदूत डॉक्टर अमजद पठाण , महाराष्ट्राचे प्रसिद्ध संगीतकार कौशल इनामदार व महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेचे संस्थापक एन.डी. खान यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय कार्य दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.






**दिपक बडगुजर यांची थोडक्यात ओळख**

विशेष उल्लेखनीय कार्य भारतीय संविधान जनजागृती अभियान समन्वयक १० राज्यस्तरीय व १ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित सर्व नवोपक्रमांमध्ये नवी मुंबई शाळेमधून नेहमी अग्रेसर फलकलेखन सर्वोत्तम व वृत्तवाहिनी- वर्तमानपत्र बातम्यांमध्ये शाळा नेहमी अग्रेसर गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना स्वखर्चाने शैक्षणिक साहित्याचे वाटप करने.अशा अनेक क्षेत्रात त्यांनी शैक्षणिक व सामाजिक कार्य केलेले आहे. पुरस्कार घेताना त्यांच्यासमवेत नांदेड येथील एम. एस. ई. बी. चे सहाय्यक अभियंता राजेंद्र पाटील, नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक विद्यालय शाळा क्रमांक १०३ चे जेष्ठ शिक्षक श्रीकांत कुठे उपस्थित होते दिपक बडगुजर यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल नवी मुंबई महानगरपालिकचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे , उपायुक्त शिक्षण तथा सचिव संघरत्ना खिल्लारे, शिक्षणाधिकारी अशोक कडूस तसेच इतर मान्यवरांनी खूप खूप अभिनंदन केलेले आहे. दिपक बडगुजर हे पाचोरा तालुक्यातील राणीचे बांबरुड येथील पेन्शनर मुख्याध्यापक कै. नामदेव भिका बडगुजर यांचे चिरंजीव आहेत.

## सामाजिक न्याय विभाग सहाय्यक आयुक्त श्रीमती सुकेशिनी तेलगोटे यांचे निलंबन करावे!! - समाजभूषण उत्तमराव गायकवाड

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** नागपूर लोकमत दैनिकात सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेश बाबतीत मांग व मेहतर या समाजाला विशेष प्रधान्य जाहिरात देवून 57 मागासवर्गीय घटकात खळबळ उडाली असून शासन फक्त मांग मेहतर समाजाला प्राधान्य कसे देऊ शकते याचा जाहिर निषेध करण्यात येत तर आहेच.परंतु ऐन उपवर्गिकरण बाबतीत होत असलेला मांग विरोधी 58 जाती घटकात जो संघर्ष शिगेला पोहचला त्यात तेल टाकणारी ही जाहिरात आहे आणि आताच ही जाहीर का हा तेलगोटे यांचा काय हेतू आहे म्हणून सरकारने सुकेशिनी तेलगोटे यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते समाजभूषण उत्तमराव गायकवाड यांनी एका पत्रकाद्वारे महाराष्ट्र सरकारला केली आहे

ही जाहिरात उपवर्गिकरण वादादित संघर्षात तेल ओतावे म्हणून प्रकाशित होणारी जाहीर टाकताना सामाजिक न्याय मंञी संजय शिरसाठ व विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदिप कांबळे यांची किंवा ईतर वरिष्ठ अधिकारी यांची परवानगी घेतली होती का याचीही चौकशी झाली पाहिजे अशीही मागणी उत्तमराव गायकवाड यांनी केली आहे. सरकारला या जाहिरातीमुळे मागासवर्गीय घटकात संघर्ष घडवून आणायचा आहे आहे मांगा व मेहतर समाजाला प्राधान्य तर 1198 असणार्या वसतिगृहातील जागा मांग मेहतरला देऊन टाकाव्यात .तेलगोटे यांना एवढं देखिल समजत नाही सामाजिक न्याय विभागाच्या मुलांच्या वसतिगृहाला महामानव डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव तर मुलींच्या वसहतीगृहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले देण्याचे यांचे नाव देण्याचे आद्यादेश काढून दिले आहे. शासनाचा आदेश धुडकाऊन लावला आहे समजत नाही असे म्हणता येणार नाही पण डॉ . आंबेडकर माता, सावित्रीबाई यांचा मुद्दाम केलेला घोर अपमान आहे अश्या निष्काळजी अधिकारीवर सरकारने त्वरित कारवाई करावी अन्याथा मागासवर्गीय समाजात कलह निर्माण करु पहाणाऱ्या अधिकारीला दयामाया दाखवू नये अन्यथा येणाऱ्या पावसाळी अधिवेशन काळात आंदोलन केले जाईल असाही परखड ईशारा शासनाला समाजभूषण उतमराव गायकवाड यांनी दिला आहे

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# समाजासाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व : श्री निवृत्तीनाना थेटे

## महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, सेवाभावी नेतृत्वाचा 93 वर्षांचा प्रेरणादायी प्रवास


**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहूल कुलकर्णी** : आयुष्यभर आपल्या कर्तृत्वाने, परिश्रमाने आणि संस्कारांनी अनेकांचे जीवन समृद्ध करणारे महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक आदरणीय श्री निवृत्तीनाना भाऊराव पांडुरंग थेटे यांचा 15 जून रोजी 93 वा वाढदिवस उत्साहात साजरा होत आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रांतून शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या कार्याचा गौरवपूर्वक आढावा घेतला जात आहे.

15 जून 1933 रोजी पालखेड येथील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या निवृत्तीनानांचे बालपण अत्यंत संघर्षमय परिस्थितीत गेले. लहान वयातच वडिलांचे छत्र हरपल्याने आई सरूबाई थेटे, भाऊ कै. कारभारी थेटे तसेच कुटुंबातील ज्येष्ठांच्या संस्कारांत त्यांचे व्यक्तिमत्त्व घडले. आर्थिक अडचणींमुळे त्यांचे शिक्षण इयत्ता पाचवीपर्यंतच झाले; मात्र जिद्द, कष्ट आणि प्रामाणिकपणाच्या बळावर त्यांनी जीवनात यशस्वी वाटचाल केली.

शेती व्यवसायातून कुटुंबाची प्रगती साधत असताना त्यांनी समाजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रातही उल्लेखनीय योगदान दिले. शिक्षणमहर्षी आदरणीय गुलाबराव (अण्णाजी) जोंधळे यांच्या सहवासात 1968 पासून महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या कार्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी सातत्याने योगदान देत आज उपाध्यक्ष म्हणून जबाबदारी समर्थपणे सांभाळली आहे.

समाजसेवेची आवड आणि



लोकांप्रती असलेली बांधिलकी यामुळे त्यांनी पालखेड गावचे सरपंच, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे चेअरमन यांसारखी महत्त्वाची पदे भूषविली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासकामांना चालना मिळाली. लोकसंग्रह, शिस्तप्रियता आणि सेवाभाव यामुळे त्यांनी समाजात स्वतंत्र ओळख निर्माण केली.

निवृत्तीनानांना वाचनाची विशेष आवड असून टांगा शर्यतीच्या क्षेत्रातही त्यांनी एकेकाळी नाशिक, अहिल्यानगर आणि ठाणे जिल्ह्यांत नावलौकिक मिळविला होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील उत्साह, धैर्य आणि जिद्द आजही अनेकांना प्रेरणा देत आहे.

त्यांच्या संस्कारांचा प्रभाव पुढील पिढ्यांवरही स्पष्टपणे दिसून येतो. मुलगा श्री. भाऊसाहेब (दादा) थेटे यांनी सरपंचपद भूषविले असून सुनबाई सौ. रंजनामाई थेटे यांनी पंचायत समिती सदस्य, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक, सरपंच तसेच विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदाची जबाबदारी सांभाळली आहे. दुसऱ्या सुनबाई सौ. अर्चनाताई संजय थेटे यांनीही सरपंच म्हणून कार्य केले आहे. चार मुले, चौदा नातवंडे, एकवीस पणतवंडे आणि विस्तारित कुटुंबासह एकूण 46 सदस्यांचे मोठे कुटुंब त्यांच्या छत्रछायेखाली एकत्र नांदत आहे.

निवृत्तीनानांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कामाप्रती असलेली प्रामाणिकता, लोकांवरील प्रेम, नियमांचे पालन आणि सकारात्मक दृष्टिकोन. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेकांनी संकटांशी सामना करण्याची ताकद, कर्तव्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी शिकली. साधेपणा, सत्यता आणि दयाळूपणा या मूल्यांचे त्यांनी आयुष्यभर जतन केले.

आजच्या धावपळीच्या युगात निवृत्तीनानांसारख्या ज्येष्ठांचे अनुभव, मार्गदर्शन आणि आशीर्वाद हे समाजासाठी अमूल्य ठेवा आहेत. त्यांच्या कार्यातून समाजसेवा, शिक्षणप्रेम आणि संस्कारांचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत राहील, यात शंका नाही.

त्यांच्या 93 व्या वाढदिवसानिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि आनंदी जीवनासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

माहिती संकलन : श्री दत्तात्रेय गुलाबराव जोंधळे, सचिव, महाराष्ट्र शिक्षण संस्था, निमगाव जाळी

शब्दांकन : राहुल रामदास दवते, सहचिटणीस, श्री माणकेश्वर वाचनालय, निफाड.

---

# लाखनी तालुक्यात भेसळयुक्त मिष्ठान्न विक्रीचा सुळसुळाट; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ!

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** लाखनी तालुक्यातील अनेक मिष्ठान्न व खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री होत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. निकृष्ट दर्जाचे तेल, कृत्रिम रंग, कालबाह्य साहित्य तसेच अस्वच्छ वातावरणात तयार केलेले मिष्ठान्न पदार्थ ग्राहकांना सर्रास विकले जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र याकडे अन्न व औषध प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.तालुक्यातील अनेक मिठाई दुकाने व हॉटेलांमध्ये स्वच्छतेचे तीनतेरा वाजले असून अन्नपदार्थ उघड्यावर ठेवले जात आहेत. माशा, धूळ आणि अस्वच्छ परिसरात खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याने ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः सण-उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर मिठाईची विक्री होत असताना प्रशासनाकडून प्रभावी तपासणी मोहीम राबविली जात नसल्याने व्यापाऱ्यांचे फावले आहे.

याशिवाय अनेक प्रतिष्ठानांमध्ये ग्राहकांसाठी आवश्यक असलेल्या स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा, पिण्याचे पाणी तसेच बसण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याचे चित्र दिसून येत आहे. शासनाने ग्राहकांच्या सोयीसाठी विविध नियम व मार्गदर्शक सूचना जारी केल्या असतानाही त्यांची उघडपणे पायमल्ली केली जात आहे.

नागरिकांनी अनेकदा संबंधित विभागाकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. अन्न व औषध प्रशासनाने तातडीने विशेष तपासणी मोहीम राबवून भेसळयुक्त अन्नपदार्थ विकणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करावी, तसेच ग्राहक सुविधा अनिवार्यपणे उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी होत आहे."नफेखोरीच्या हव्यासापोटी नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल," असा इशाराही सामाजिक संघटना व जागरूक नागरिकांनी दिला आहे.

# दुचाकी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास कामोठे पोलिसांनी केले गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमधून दुचाकी चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला कामोठे पोलिसांनी अटक केली आहे.

चेतन कातकर (34) असे त्याचे नाव असून, त्याने कामोठे व कळंबोली पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील केलेले एकूण चार वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. या गुन्ह्यातील एक दुचाकी पोलिसांनी हस्तगत केली आहे. त्याच्याकडून आणखी काही वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. निहार पाल (23) या तरुणाने खांदेश्वर रेल्वे स्टेशनच्या पार्किंगमध्ये त्याची दुचाकी पार्क केली होती. ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. निहार सायंकाळी परत आल्यानंतर त्याला दुचाकी चोरीस गेल्याचे निदर्शनास आले होते. त्यावर त्याने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर पो.नि. मनोहर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. गणेश दळवी, पीएसआय प्रतापसिंह चव्हाण, पो.हवा.संजय झोळ, प्रशांत जाधव, कुणाल म्हात्रे, पो.ना. सचिन ठोंबरे, पो.शि.दत्ता जाधव, राजेंद्र इलग, प्रमोद कोकाटे व त्यांच्या पथकाने घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यात त्यांना आढळलेला संशयिताचा फोटो त्यांनी येथील गॅरेज चालक, पार्किंग कर्मचारी व इतरांना दाखवण्यात आला होता. त्याच्या चार दिवसांनंतर तो पुन्हा खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या पार्किंग परिसरात आल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने त्याचे नाव चेतन कातकर असून, तो मुंबईतील वडाळा पश्चिम येथील गणेश नगर परिसरात राहत असल्याचे सांगितले. तसेच त्याने वाहनचोरीचे आणखी गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली. त्यात कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत 3 व कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत 1, असे 4 गुन्हे केल्याचे सांगितले.

त्यावर पोलिसांनी त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त केली आहे.

**स्वेता मोरे हिचा झाला सत्कार**

# बी.एल.एस. एल.एल.बी. परीक्षेत मिळविले सुयश



**दैनिक युवक आधार**

**नागोठणे प्रतिनिधी :** येथील नाभिक समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते नरेश मोरे यांची सुकन्या स्वेता मोरे हिने अलिबाग येथील ॲड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ येथून बी.एल.एस. एल. एल. बी. चे शिक्षण पूर्ण करून सुयश संपादित केले. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत स्वेताने मिळविलेल्या यशाबद्दल तिचे तसेच तिचे वडील नरेश मोरे व आई चित्रा मोरे यांचे रायगड जिल्हा नाभीक संघाचे माजी जिल्हाध्यक्ष दिनेश मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार 12 जून रोजी तिच्या नागोठणे येथील राहत्या घरी जाऊन शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी रोहा तालुका माजी अध्यक्ष रविंद्र टके,दिगांबर खराडे,महेंद्र पवार,ऋषिकेश कोंडे उपस्थित होते.

---

# श्रीवर्धन-आराठी मार्गावर धोकादायक वडाचे झाड; प्रशासनाने तातडीने कारवाई करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : कोलमडलेल्या अवस्थेतील झाडामुळे अपघाताचा धोका; पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करण्याची गरज श्रीवर्धन-आराठी ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य रस्त्यालगत असलेले एक मोठे वडाचे झाड सध्या कोलमडलेल्या अवस्थेत असून, त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. हे झाड कधीही कोसळण्याची शक्यता असल्याने जीवित व



वित्तहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे.श्रीवर्धन परिसराने यापूर्वी निसर्ग चक्रीवादळासारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना केला आहे.

तसेच किनारपट्टी भाग असल्याने पावसाळ्यात जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा सामना करावा लागतो.

अशा परिस्थितीत हे धोकादायक झाड मोठ्या दुर्घटनेचे कारण ठरू शकते.मुख्य रस्त्यावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक, विद्यार्थी आणि वाहनांची ये-जा सुरू असते.

त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत, वन विभाग आणि प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने पाहणी करावी व आवश्यक ती कारवाई करून हे झाड हटवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाने वेळीच उपाययोजना करणे गरजेचे असून, दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा आधीच खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# धोंडी धोंडी पाणी दे... पावसासाठी बालकांची अनोखी दिंडी

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ एम डी सुरोशे महागाव, :** पावसाने अद्याप हजेरी लावली नसल्याने शेतकरी व नागरिक चिंतेत असताना सावरगाव (ता. घाटंजी) येथील मुलांनी पावसासाठी पारंपरिक पद्धतीने "धोंडी धोंडी पाणी दे" अशी हाक देत महागाव शहरात दिंडी काढली.

या दिंडीत सहभागी झालेल्या मुलांनी गावातील विविध भागांत फिरून पावसासाठी प्रार्थना केली. "धोंडी धोंडी पाणी दे, साळी-दाळी पिकू दे" अशा घोषणा देत त्यांनी वातावरण भक्तिमय व उत्साहपूर्ण केले. ग्रामीण भागातील जुनी परंपरा जपण्याचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.

या दिंडीत विक्रम चव्हाण, दीपक शेंडे, सुरेश बेंदूर, आकाश राठोड, राहुल गावंडे व



आकाश क्षीरसागर यांनी सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत मुलांच्या उत्साहाला दाद दिली.

सध्या सर्वत्र पावसाची प्रतीक्षा लागून राहिली असून, बालकांनी काढलेल्या या दिंडीमुळे पावसासाठी करण्यात येणाऱ्या पारंपरिक लोकपरंपरांची आठवण ताजी झाली आहे. गावकऱ्यांनीही लवकरच चांगला पाऊस पडावा व शेतकऱ्यांच्या आशा पूर्ण व्हाव्यात, अशी प्रार्थना केली.

---

# बिरसा मुंडा यांच्या स्मृति दिना सोबतच गुणवंतांचा सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** - राष्ट्रीय आदिवासी लोक जागर प्रबोधनी व बडादेव महादेव चारिटेबल ट्रस्ट नागपूर च्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा यांचा १२६ वा स्मृति दिवस व प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारोह शुक्रवार दि.12 जून 2026 रोजी सायंकाळी झांसी रानी चौक, नागपूर येथील हिंदी मोर भवन मधे उत्साहात पार पडला.

या परिचर्चा सत्राचे अध्यक्षपद मा. उत्तम तोडासे (रा. आलोजाप्र संगठक) यांनी भूषविले.उद्घाटन मा. शिवराम भलावी भा.व.से. (सेवानिवृत्त) यांच्या द्वारा झाले." वसाहतकारांच्या विरोधात क्रांतीसुर्य बिरसा मुंडाची विद्रोही भुमिका एक




विमर्श" या विषयावर मा. तुकाराम वरकडे (संयोजक राल्प) यांनी आपले विचार मांडलेत. यावेळी 12वी मधील लवेश प्रदीप वरखडे, 10वी मधील देवांशी प्रवीण मसराम, यशश्री उमेश पेंदार, मृणाल सुरेश मसराम, केशव विकास उईके, रिता नारायण आंधे, सत्या सर्वजित धूर्वे, रिद्धी राजेंद्र कोराम, भूमिका विनोद कोराम, लावण्या नंदकुमार मडावी, मोहिनी लक्ष्मण सरयाम, चांदणी ओमप्रकाश परतेकी, शौर्य मनीष कोकर्डे आणि आर्य जितेंद्र कोकर्डे या प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# महावितरणकडून ग्राहकांना स्मार्ट मीटर बसवण्याचे मेसेज !!; सक्ती न करण्याची नागरिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : सध्या वीज ग्राहकांमध्ये महावितरण कंपनीकडून येत असलेल्या एका मेसेजमुळे चिंतेचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

तुमचे मीटर 'स्मार्ट मीटर' नसेल, तर हा संदेश मिळाल्यापासून ४८ तासांनंतर MSE D C L (महावितरण) किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींद्वारे तुमचे सध्याचे मीटर बदलून त्याऐवजी 'स्मार्ट मीटर' बसविण्यात येणार आहे. कृपया नोंद घ्यावी की, हा संदेश तुमचे सध्याचे मीटर बदलण्याबाबतची पूर्वसूचना आहे. याचाच अर्थ असा की, "तुमच्या घरचा जुना वीज मीटर बदलून त्या जागी नवीन 'स्मार्ट मीटर' बसवण्यात येणार आहे," अशा आशयाचे मेसेज महावितरणकडून ग्राहकांच्या मोबाईलवर धडकत आहेत. या पार्श्वभूमीवर, "महावितरण कंपनीने स्मार्ट मीटर लावण्याची जबरदस्ती करू नये," अशी आक्रमक भूमिका सामान्य वीज ग्राहक आणि विविध ग्राहक




संघटनांनी घेतली आहे.

नवीन स्मार्ट मीटर प्रणालीबाबत ग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणावर संभ्रम आणि अविश्वास आहे. मुख्यत्वे ग्राहकांनी खालील कारणांमुळे या मीटरला विरोध केला जात आहे,ग्राहकांना स्मार्ट मीटर लावल्यावर अवाजवी वीज बिलांची येण्याची भीती आहे, त्यात सध्याचे मीटर व्यवस्थित काम करत असताना नवीन मीटर कशासाठी हा प्रश्न ग्राहकांच्या मनात आहे, स्मार्ट मीटरमुळे वीज बिल भरमसाठ वाढेल, अशी भीती सर्वसामान्यांना वाटत आहे.त्यातच अनेक ठिकाणी ग्राहकांचा स्मार्ट मीटर बसवण्याच्या सक्तीला विरोध होत आहे,ग्राहकांना विश्वासात न घेता, थेट मेसेज पाठवून मीटर बदलण्याची 'जबरदस्ती' केली जात असल्याचा आरोप

**"माझा सध्याचा मीटर अगदी व्यवस्थित चालतोय. मग जबरदस्तीने नवीन मीटर कशासाठी,आधीच महागाई वाढली आहे, त्यात नवीन मीटरचे छुपे शुल्क किंवा अवाजवी बिल आले तर सामान्य माणसाने जगायचं कसं, महावितरणने ही सक्ती थांबवावी."**

**— एक संतप्त वीज ग्राहक**

**महावितरणच्या संदेशात काय माहिती देण्यात आली आहे?**

**महावितरणच्या संदेशात स्मार्ट मीटर नसलेल्या ग्राहकांचे मीटर ४८ तासानंतर बदलण्यात येतील, अशी पूर्वसूचना देण्यात आली आहे. यामध्ये स्मार्ट मीटरचे फायदेही नमूद करण्यात आले आहेत. जसे की अचूक बिलिंग, मोबाईल ॲपद्वारे वीज वापरावर नियंत्रण आणि सौरऊर्जेच्या वापरावर सवलत.**

नागरिकांनी केला आहे. या मेसेजनंतर नागरिकांत संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. "ग्राहक तयार नसतील तर त्यांच्यावर स्मार्ट मीटर लादले जाऊ नयेत," अशी मागणी केली जात आहे.जिल्ह्यात काही ठिकाणी समाजिक संघटनांनी यात उडी घेतली असून, जनतेवर कोणतीही सक्ती करू नये, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा महावितरण प्रशासनाला दिला आहे. विरोधानंतर महावितरणकडून काही प्रमाणात स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. "हे मीटर सरकारच्या योजनेचा भाग असून यामुळे ग्राहकांना अचूक बिलिंग मिळेल आणि वीज चोरीला आळा बसेल,"असा दावा कंपनी करत आहे. परंतु, जोपर्यंत ग्राहकांच्या मनातील शंकांचे निरसन होत नाही, तोपर्यंत कोणतीही जबरदस्ती न करता हा निर्णय ऐच्छिक ठेवावा, अशी एकमुखी मागणी सध्या जोर धरत आहे.

# जगातील प्रथम ट्रिलियनर एलॉन मस्क

**दैनिक युवक आधार**

**दक्षिण नागपूर डॉ सुनिल भगत प्रतिनिधी** : एलॉन मस्क हे त्यांच्या एरोस्पेस कंपनी, स्पेसएक्सच्या ऐतिहासिक प्रारंभिक सार्वजनिक भागविक्रीमुळे (आयपीओ) अधिकृतपणे जगातील पहिले ट्रिलियनपती बनले आहेत . स्पेसएक्स आणि टेस्लामधील त्यांच्या मोठ्या हिस्सेदारीमुळे त्यांची निव्वळ संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेली आहे.

**१.१ ट्रिलियन डॉलर्स**

गेल्या काही दिवसांत जगभरात एक बातमी गाजत आहे.

स्पेस एक्स च्या IPO नंतर एलॉन मस्कची संपत्ती १.१ ट्रिलियन ( १ लक्ष करोड) डॉलर्सच्या पुढे गेली आणि तो इतिहासातील पहिला ट्रिलियनर ठरला. एलॉन मस्क ज्याने टेस्ला गाडीने इतिहास घडविला, ट्विटर विकत घेऊन त्याला X हे नवीन नाव दिले , २०२४-२५ ला ट्रम्प ला निवडणूक जिंकायला मदत केली असा अती श्रीमंत माणूस! एलॉन मस्कची संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेली अशी बातमी आपण सकाळी वर्तमान पत्रात वाचली असताना तोंडात बोटे घातली होती. आपल्यापैकी बहुतेकांना ट्रिलियन म्हणजे किती हे समजतच नाही. आपण लाख, कोटी, हजार कोटी इथपर्यंत आपली मजल जात नाही. मिलियन म्हणजे एका वर सहा शून्य १,०००,००० म्हणजे १० लाख होतात आणि एक बिलियन म्हणजे एका वर नऊ शून्य १,०००,०००, ००० म्हणजे १०० कोटी म्हणजे १ अब्ज म्हणजे १ महापद्म होय.

पण ट्रिलियन हा असा आकडा आहे की तो समजून घेण्यासाठी मेंदूला थोडा जास्त व्यायाम द्यावा लागतो. १ लक्ष करोड म्हणजे एका वर १२ शून्य १,०००,०००, ०००, ००० होतात. या संख्येला भारतीय मोजमाप पद्धतीनुसार खरब असेही म्हणतात.

हा शब्द आंतरराष्ट्रीय स्तरावर देशांची अर्थव्यवस्था (GDP) किंवा मोठ्या कंपन्यांचे मूल्यांकन (Valuation) मोजण्यासाठी वापरला जातो.

ट्रिलियन हा आकडा किती मोठा आहे हे समजण्यासाठी अजून एक उदाहरण म्हणजे एक अब्ज सेकंद म्हणजे साधारण ३१ वर्षे. पण एक ट्रिलियन सेकंद म्हणजे जवळपास ३१,७०० वर्षे. म्हणूनच ट्रिलियन हा फक्त मोठा आकडा नाही. तो आपल्या कल्पनेच्या पलीकडला आकडा आहे.

SpaceX च्या IPO ( initial public offering) म्हणजे एखादी कंपनी प्रथमच आपले शेअर्स सर्व सामान्य लोकांसाठी उपलब्ध करते. च्या दिवशी मस्कच्या संपत्तीत सुमारे ६२ अब्ज डॉलर्सची एका दिवसात भर पडली. भारतीय रुपयांत फक्त ५ लाख कोटी रुपये होतात. आज प्रति एक डॉलर किंमत भारतीय रुपये ९५.१० ते ९५.५० प्रमाणे आहे. आपण वर्षभर कष्ट करून १०% दिवाळी बोनस मिळाला की आनंदी होतो. आपला एखादा शेअर २०% वाढला की स्क्रीनशॉट मित्रांना पाठवतो. पण मस्कच्या बाबतीत एका दिवसात जितकी संपत्ती वाढली, ती भारतातील अनेक मोठ्या उद्योगसमूहांच्या बाजारमूल्यापेक्षाही जास्त आहे.

**जगातील अतिश्रीमंत लोक**

जगातील श्रीमंत लोकांची यादी उघडली की त्यात अमेझॉनचे संस्थापक जेफ बेझोस, मेटा(फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सअपची मूळ कंपनी) चा प्रमुख आपला मार्क झुकरबर्ग , गुगल




चे सहसंस्थापक ल्यारी पेज , गुगल चे सहसंस्थापक सर्जी ब्रायन , ओरॅकल चे संस्थापक ल्यारी एलिसन आणि डेल कॉम्प्युटर्स चे संस्थापक मायकल डेल अशी नावं दिसतात. ही मंडळी स्वतःच आर्थिक विश्वातील महाकाय व्यक्तिमत्त्वं मानली जातात. पण SpaceX च्या IPO नंतर परिस्थिती अशी झाली की या सर्व दिग्गजांच्या एकत्रित संपत्तीपेक्षाही एलॉन मस्कची संपत्ती खूपच जास्त झाली. म्हणजे Amazon, Google, Meta, Oracle आणि Dell या कंपन्यांच्या संस्थापकांची एकत्रित श्रीमंती एका बाजूला आणि एकटा मस्क दुसऱ्या बाजूला आहे. थोडक्यात सांगायचं तर, आपण ज्यांना जगातील सर्वात श्रीमंत लोक समजतो, त्यांना एकत्र केल्यावर जेवढी संपत्ती तयार होते, तेवढी संपत्ती आता ह्या एका माणसाकडे आहे.

**आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तीं मुकेश अंबानी**

भारतीय मुकेश अंबानी हे आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक आहेत. त्यांच्या संपत्तीचं प्रदर्शन आपण त्यांच्या घरातील लग्न, गरबा, वाढदिवस, आरंगेत्रम वगैरे कार्यक्रमात उधळल्या जाणाऱ्या बडेजाव मधून बघत असतो. मुलाच्या लग्नात मागच्या वर्षी त्यांनी ५००० कोटी रुपये खर्च केले होते. ते पाहूनही बहुतेक लोकांचे डोळे विस्फारले . पण मस्कच्या १.१ ट्रिलियन डॉलर्सच्या तुलनेत अंबानींची संपत्ती हिमनगाचा छोटासा भाग ठरतो. ढोबळमानाने सांगायचं तर, मस्कच्या संपत्तीमध्ये अनेक मुकेश अंबानी मावू शकतात.रिलायंस इंडस्ट्रीज ही भारतातील सर्वात मोठ्या आणि सर्वात मौल्यवान कंपन्यांपैकी एक आहे. तिचं संपूर्ण बाजारमूल्य सुमारे १८० ते १९० अब्ज डॉलर्सच्या आसपास आहे. आणि मस्कची संपत्ती १.१ ट्रिलियन डॉलर्स इतकी गडगंज झाली आहे . म्हणजे मस्कच्या संपत्तीमध्ये साधारण सहा रिलायन्स इंडस्ट्रीज सहज मावू शकतात. एका व्यक्तीची नेटवर्थ आणि भारतातील सर्वात मोठ्या उद्योग समूहां पैकी एक कंपनी ह्यांची तुलना मस्कच्या संपत्तीची कल्पना द्यायला पुरेशी आहे.

**मस्क ची संपत्ती**

मस्ककडे हे पैसे रोख स्वरूपात नाहीत. त्याच्या घरात कुठेतरी ट्रिलियन डॉलर्सच्या नोटा रचून ठेवलेल्या नाहीत. त्याच्या संपत्तीचा मोठा भाग SpaceX, Tesla आणि इतर कंपन्यांमधील मालकीहक्कातून येतो. त्यामुळे आज शेअरची किंमत वाढली तर तो अधिक श्रीमंत होतो. उद्या बाजार पडला तर काही अब्ज डॉलर्स एका दिवसात कागदावरून नाहीसे होऊ शकतात. आपण पाच हजार रुपयांचा तोटा झाला तरी दोन दिवस विचार करत बसतो. त्याच्या बाबतीत अस्वस्थता अब्ज डॉलर्समध्ये मोजली जाते. शंभर वर्षांपूर्वी जगातील सर्वात श्रीमंत लोक तेल, पोलाद, रेल्वे किंवा जमीन संबंधित धंद्यातून श्रीमंत होत होते. पण आज जगातील सर्वात श्रीमंत माणूस रॉकेट्स, उपग्रह, इंटरनेट, इलेक्ट्रिक गाड्या आणि AI च्या जोरावर ट्रिलियनर झाला आहे. आज पैशाच्या बाबतीत त्याचे स्त्रोत बदललेले आहेत.

**स्पेस एक्स**

२००२ मध्ये मस्कने SpaceX सुरू केली तेव्हा अनेकांनी त्याला मूर्खात काढले होते. त्याची रॉकेट्स पडली. स्फोट झाले. अपयश आलं. पण दोन दशकांनंतर त्याच कंपनीने त्याला इतिहासातील पहिला ट्रिलियनर बनवलं. म्हणून ही केवळ एका श्रीमंत माणसाची गोष्ट नाही. ही गोष्ट मोठी स्वप्नं पाहण्याची, अपयश पचवण्याची आणि दूर दृष्टीने भविष्यात गुंतवणूक करण्याची आहे. त्याच्या एकूण निव्वळ संपत्तीपैकी अंदाजे ६९० अब्ज डॉलर्सचे मूल्य, त्याच्या धमाकेदार बाजारपेठेतील पदार्पणामुळे वाढले आहे.

**टेस्ला**

या इलेक्ट्रिक वाहन निर्माता कंपनीमधील त्यांचा हिस्सा सुमारे २७१ अब्ज डॉलर्सचा सुमारे २७१ अब्ज डॉलर्सचा आहे.

**इतर उपक्रम**

यामध्ये न्यूरालिंक आणि द बोरिंग कंपनीमधील भरीव गुंतवणुकीसह , जेट्स आणि खाजगी मालमत्तांचा समावेश आहे.

**एलन मस्क ची जीवन शैली**

जागतिक श्रीमंतांच्या यादीत अग्रस्थानी असूनही, मस्क आश्चर्यकारकपणे तुलनेने साधे जीवन जगतात. एखाद्या भव्य वाड्याऐवजी, ते प्रामुख्याने टेक्सासमधील सुमारे ४०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या एका लहान, पूर्वनिर्मित घरात राहतात.

**माणसाला मंगळावर पाठवायची इच्छा**

आपण रोज सकाळी उठतो चहा पितो, वर्तमान पत्र वाचतो, सोशल मीडिया वर जाऊन पोस्ट टाकतो बाजारात जाऊन घेतलेल्या वस्तूचे पैसे UPI ने पेटीएम ने करतो, आणि महिन्याच्या EMI चा विचार करतो. काही जण आता चार चाकी, SUV वर आले आहेत.पण जगाच्या दुसऱ्या टोकाला हा मस्क ज्याची संपत्ती आता ट्रिलियनमध्ये मोजली जाते. त्याचे पुढचं स्वप्न अजून पैसे कमावण्यापेक्षा माणसाला मंगळावर पाठवायचं त्याचं स्वप्न आहे.

**जगातील पहिला ट्रिलियनेयर!**

अंदाजे १.११ ट्रिलियन डॉलर्सच्या निव्वळ संपत्तीसह, इलॉन मस्क अधिकृतपणे जगातील पहिले ट्रिलियनपती बनले आहेत. त्यांच्या संपत्तीतील ही वाढ त्यांच्या स्पेस एक्स एरोस्पेस कंपनीच्या ऐतिहासिक आयपीओमुळे झाली , ज्यामुळे तिचे मूल्यांकन २ ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे गेले. काही लोक पैसा कमावतात. काही लोक कंपन्या उभ्या करतात. आणि काही लोक इतकी मोठी स्वप्नं पाहतात की एक दिवस त्यांची संपत्ती ट्रिलियनमध्ये मोजली जाऊ लागते.

एलॉन मस्क त्या तिसऱ्या प्रकारात मोडतो. वेडा, धोरणी आणि यशस्वी! जगातील पहिला ट्रिलियनेयर!

## साडीच्या आमिषाने दागिने केले लंपास

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** आमचे शेठ सरदार यांना दहा वर्षानंतर मुलगा झाला आहे, तुम्हाला साडी भेटली का? असे सांगून 54 वर्षीय महिलेच्या गळयातील दोन लाख तीस हजार रुपयांचे दागिने फसवून नेल्याप्रकरणी तिघां विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 11 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.54 वर्षीय मंगल किसन कोरडे ह्या कळंबोली सेक्टर 4 येथे राहत असून त्या सावंत फ्लोअर मिल येथे दळण टाकून घरी परत जात होत्या. यावेळी तीन अनोळखी इसमानी त्यांना गाठले आणि पुढच्या गल्लीमध्ये गरीब महिलांना साड्या आणि बक्षीस वाटप सुरू असल्याचे सांगितले. यावेळी आमचे शेठ सरदार यांना दहा वर्षानंतर मुलगा झाला आहे तुम्हाला साडी भेटली का असे सांगून त्यांना सेक्टर 3, सह्याद्री सोसायटी, कळंबोली येथे घेऊन गेले. आणि या ठिकाणी त्यांची दिशाभूल करून त्यांच्याकडील सोन्याचे मंगळसूत्र, सोन्याची चैन, अंगठी घेऊन ते पळून गेले.

## पोलिसांच्या वाहनाला दुचाकीची धडक, दोघेजण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पोलिसांच्या वाहनाला दुचाकीने धडक दिली. या झालेल्या अपघातात दुचाकी वरील दोघेजण जखमी झाले. या अपघाता प्रकरणी ईशान राजीव (वय वीस वर्ष, राहणार सेक्टर 17, रोडपाली) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात 11 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.पोलीस हवालदार अजय मोरे हे दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई येथे कार्यरत आहेत. ते वाहन क्रमांक एम एच ०१ ई एन ६४४२ हे लोटस हॉस्पिटल, रोडपाली येथील टी पॉइंट येथे वळण घेऊन पोलीस मुख्यालयाकडे जात होते. यावेळी ईशान याने मोटरसायकल क्रमांक एम एच 46 सीएस 0141 ही फुडलँड सिग्नल कडून पुरुशार्थ ब्रिज कडे जाणाऱ्या रोडवर स्पीड ब्रेकर कडे दुर्लक्ष करून वेगाने चालवली. आणि सरकारी वाहनाला समोरील बाजूने ठोकर मारली. या अपघातात ईशान राजीव आणि त्याच्या पाठीमागे बसलेली श्रिया गोरे ही जखमी झाली. या अपघातात पोलिसांच्या वाहनाचे नुकसान झाले.

## कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवून दागिने पळवले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** 80 वर्षीय महिलेला दोन अनोळखी इसमानी कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या गळयातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 11 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रामूबाई बाळाराम घरत या खारकोपर येथे राहत असून त्या 11 जून रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास शिवाजी चौक, पनवेल येथे घरातील किराणा मालाचा बाजार खरेदीसाठी आल्या होत्या. यावेळी दोन अनोळखी इसमानी त्यांना कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या गळयातील दागिने पिशवीत काढण्यास सांगितले आणि बिस्कीट पुडे पिशवीत ठेवण्याच्या बहाण्याने पिशवीतून त्यांचे दागिने आणि पैसे काढून घेऊन त्यांची फसवणूक केली.

## ओतारी समाज संघ अमरावती जिल्हा कार्यकारिणीतर्फे अंजनगाव सुर्जी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व पालकांचा सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : ओतारी समाज संघ, अमरावती जिल्हा कार्यकारिणी यांच्या वतीने अंजनगाव सुर्जी येथे समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व पालकांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या यशामागील पालकांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी **मोहनजी तराळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून **दीपकराव कंडारे उपस्थित होते. यावेळी ओंकारजी राऊत, विनोदराव डोंगरे, ज्ञानेश्वर डांगरकर, ज्योत्स्नाताई करवाडे, आशाताई सायगाव आणि श्रीरामजी वन्हाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून नगराध्यक्ष अविनाशभाऊ गायगोले उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हेच यशाचे खरे साधन असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने बाळगून सातत्याने परिश्रम केल्यास कोणतेही ध्येय गाठता येते, असे प्रतिपादन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांच्या यशामागे पालकांचे मोलाचे योगदान असल्याचे नमूद करून पालकांचेही अभिनंदन केले.

या सोहळ्यात इयत्ता दहावी व बारावी परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या यशासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या पालकांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. एकूण २८ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अमोल वऱ्हाडे, विनयराव तायवाड, अशोक बोराडे, रूपेश तायडे व अनिल बोराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश तायवाडे यांनी केले, तर प्रास्ताविक शिवकुमार पटवे यांनी केले.

यावेळी जिल्हा कार्यकारिणी सदस्य दिनेश अढागले, सुभाष पटवी, मनोज बोराडे, राजेश तायवाडे, रवीभाऊ तायडे, सौ. जयाताई तायडे, सौ. कार्तिका तायडे व सौ. सारिका बोराडे यांच्यासह समाजबांधव, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाजातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी प्रेरणा निर्माण करणारा हा गुणगौरव सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. उपस्थित मान्यवरांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील शैक्षणिक प्रगतीला चालना देणारा हा उपक्रम सर्व स्तरांतून कौतुकास पात्र ठरवेल.

## निरोगी, व्यसनमुक्त भविष्यासाठी सहकार्य

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** -जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (डीएलएसए), मुंबई यांनी, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या सहकार्याने, 'ड्रग अवेअरनेस अँड वेलनेस नेव्हिगेशन स्कीम' (DAWN) अंतर्गत ९ जून, २०२६ रोजी चेंबूर पूर्व येथील प्रथम एज्युकेशन सेंटरमध्ये एक प्रभावी जनजागृती कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केला.

बॉस्को डिसोझा (राष्ट्रीय संचालक आणि कार्यकारी समिती सदस्य, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य) हे आमचे सन्माननीय साधन व्यक्ती म्हणून लाभले, याचा आम्हाला अभिमान आहे. त्यांनी एक प्रभावी, महत्त्वपूर्ण आणि अत्यंत माहितीपूर्ण सत्र सादर केले, ज्यामध्ये त्यांनी विविध प्रकारच्या अमली पदार्थांची आणि त्यांच्या गैरवापराच्या प्रकारांची ओळख करून दिली व त्यांच्या धोकादायक परिणामांवर प्रकाश टाकला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्यांनी वैयक्तिक आणि सामुदायिक पातळीवर व्यसनाचा सामना कसा करावा यासाठी कृती करण्यायोग्य धोरणे आणि व्यावहारिक पद्धती सांगितल्या.

युवकांनी संवादाचे नेतृत्व केले!

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग, जे संपूर्ण सत्रादरम्यान अत्यंत सक्रिय आणि संवादात्मक होते. त्यांचे विचारपूर्वक प्रश्न, सक्रिय संवाद आणि रस यातून अधिक आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याचा त्यांचा प्रबळ सामूहिक निर्धार दिसून आला.

समर्पित तळागाळातील आणि शैक्षणिक संस्थांसोबत हातमिळवणी करून, डीएलएसए मुंबई आपल्या युवक आणि रहिवाशांसाठी अधिक मजबूत, अधिक माहितीपूर्ण आधार प्रणाली तयार करण्याचे ध्येय बाळगते.

सचिव पवनकुमार तापडिया सर, डीएलएसए मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्रीमती मनीषा चव्हाण, डीएलएसए यांच्या पाठिंब्याने, आम्ही कायदेशीर साक्षरता, आरोग्य आणि सामाजिक कार्य तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे आमचे ध्येय पुढे नेत आहोत.

पूनम जाधव (डीएलएसए, ॲड. बाळासाहेब आपटे विधी महाविद्यालय), संगीता वेटल (डीएलएसए, पीएलव्ही), आयुष साळवे (अस्मिता विधी महाविद्यालय) या संघात सुश्री मनीषा चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील आणि प्रथम एज्युकेशन सेंटर, चेंबूर पूर्व, मुंबई येथील अनिल शिशुपा यांचा समावेश होता.

## अकोला जिल्ह्यात मुबलक युरिया उपलब्ध ; अफवांवर विश्वास न ठेवण्याचे कृषी विकास अधिकाऱ्यांचे आवाहन !!

**दैनिक युवक आधार**

**अकोला दिलीप कराळे प्रतिनिधी** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एक




अत्यंत दिलासादायक बातमी आहे. जिल्ह्यात सध्या मुबलक प्रमाणात युरिया खत उपलब्ध असून, आगामी काळातही त्याचा पुरवठा निरंतर सुरू राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि खत खरेदीसाठी गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव यांनी केले आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, अकोला जिल्ह्यासाठी एप्रिल ते जून या कालावधीत १४,१२२ मेट्रिक टन युरिया खत मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी तब्बल १२,६७२ मेट्रिक टन (९०%) युरियाचा पुरवठा जिल्ह्यात आधीच झाला आहे. सध्याच्या घडीला जिल्ह्यात ४,८६२ मेट्रिक टन युरिया खताचा साठा शिल्लक असून, सर्व शेतकऱ्यांना त्याचे सुरळीतपणे वाटप केले जात आहे.

नव्या रेक दाखल झाल्यावर खताचा पुरवठा आणखी वाढणार आहे,जिल्ह्यातील युरियाची उपलब्धता अधिक मजबूत करण्यासाठी खतांचा नवा साठाही दाखल होत आहे,

नर्मदा बायोकेम या कंपनीची १,३०० मेट्रिक टन युरिया खताची रेक जिल्ह्यात दाखल झाली असून, त्याचे वाटप तातडीने सुरू करण्यात आले आहे.

आगामी पुरवठा हा १७ जून २०२६ गुरुवार पर्यंत येणार असून आयपीएल कंपनीचे १,२०० मेट्रिक टन आणि चंबल कंपनीचे ९०० मेट्रिक टन असे एकूण २,१०० मेट्रिक टन युरिया खत जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे.

**कृषी विकास अधिकाऱ्यांचे शेतकऱ्यांना आवाहन:**

**"जिल्ह्यात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे आणि भविष्यातही तो अखंडितपणे मिळत राहील. शेतकऱ्यांनी घाबरून जाऊन गरजेपेक्षा जास्त खताची खरेदी करणे किंवा दुकानांवर गर्दी करणे टाळावे. कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे."**

**— डॉ. तुषार जाधव, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला.**

# रक्तदानातून घोटा गावाचा मानवतेला सलाम; युवकांच्या सामाजिक बांधिलकीने उभारला जीवनदानाचा आदर्श!"

## घोटा येथे भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न; १९ रक्तदात्यांनी दिले जीवनदायी रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : घोटा, (रिसोड )"रक्तदान हेच श्रेष्ठ दान आणि जीवन वाचविण्याचे सर्वात मोठे माध्यम आहे," या उदात्त भावनेतून घोटा येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समस्त तरुण मित्र मंडळ व गावकरी मंडळी, घोटा यांच्या संयुक्त विद्यमाने हनुमान मंदिर संस्था, घोटा येथे आयोजित या सामाजिक उपक्रमाने गावाच्या सेवाभावी परंपरेला नवे बळ दिले.सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत युवकांनी मोठ्या उत्साहाने



रक्तदानासाठी पुढाकार घेतला. रक्ताच्या एका पिशवीमुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात, ही जाणीव मनात ठेवून तब्बल १९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले. रक्तदात्यांच्या या सेवाभावी योगदानामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

हे शिबिर सौ. कांता देवी डोळे रक्तपेढी, वाशिम यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी डॉ. निरगुडे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वैद्यकीय पथकाने रक्तसंकलनाची जबाबदारी अत्यंत दक्षतेने पार पाडली. रक्तदानापूर्वी प्रत्येक रक्तदात्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करण्यात आली तसेच रक्तदानाबाबत सविस्तर मार्गदर्शनही करण्यात आले.

**"रक्तदान म्हणजे केवळ रक्त देणे नव्हे, तर एखाद्याला नवजीवन देण्याचा पवित्र संकल्प आहे."**
**घोटा गावातील युवकांनी रक्तदानातून सामाजिक एकतेचा आणि मानवतेचा आदर्श निर्माण केला.**
**१९ रक्तदात्यांच्या योगदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनाची नवी आशा मिळणार आहे.**
**"रक्तदान हेच जीवनदान" हा संदेश देत शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात समारोप करण्यात आला.**

या कार्यक्रमाला डॉ. कैलास मोरे, डॉ. रवी मोरे, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे, सरपंच अनिल मोरे, चेअरमन परमेश्वर मोरे, शिवप्रसाद सुरूशे, महेंद्र मोरे, निलेश गवळी, संदीप मोरे, दशरथ मोरे, शिवाजी मोरे, विठ्ठल लोखंडे, शंकर मोरे, अमोल गवळी, कुणाल जाधव, संतोष जाधव, कार्तिक मोरे, श्रीधर मोरे, सत्यम मोरे, अक्षय बेद्रे, अविनाश मोरे, पंकज मोरे, ज्ञानू जाधव, श्याम सुरसे, किसन शेंडगे, अमोल मोरे, संतोष मोरे, रवी मोरे, गोपाल मोरे यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे विशेष कौतुक करत, युवकांनी समाजहिताच्या अशा उपक्रमांमध्ये सातत्याने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. रक्तदानामुळे अनोळखी व्यक्तीचे जीवन वाचू शकते, त्यामुळे प्रत्येक सक्षम नागरिकाने नियमित रक्तदान करावे, असा संदेशही यावेळी देण्यात आला.

विशेष म्हणजे, केवळ घोटा गावातीलच नव्हे तर रिसोड येथील तरुणांनीही या शिबिरात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान केले. त्यामुळे या उपक्रमाला व्यापक सामाजिक स्वरूप प्राप्त झाले. गावागावांतून युवक सामाजिक कार्यासाठी एकत्र येत असल्याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समस्त तरुण मित्र मंडळ, गावकरी मंडळी, रक्तपेढीचे कर्मचारी, स्वयंसेवक आणि सर्व रक्तदात्यांचे उपस्थित मान्यवरांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. समाजहितासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे घोटा गावाने पुन्हा एकदा सामाजिक कार्यात आपला वेगळा ठसा उमटविला आहे

# मनसे विद्यार्थी सेनेचे विभाग अध्यक्ष किरण गावडे यांचा सुरक्षेसाठी पुढाकार

## पोलीस गस्त, विद्युत खांब व खड्डे दुरुस्तीची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना प्रभाग क्रमांक १७ चे विभाग अध्यक्ष किरण गावडे यांनी सेक्टर १३, नवीन पनवेल परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेशी व मूलभूत सुविधांशी संबंधित गंभीर प्रश्न प्रशासनासमोर मांडत विविध विभागांना निवेदने सादर केली आहेत.

डॉल्फिन इमारतीच्या बाजूला असलेल्या पुलाजवळ काही व्यक्तींकडून दिवसाढवळ्या तसेच रात्री उशिरापर्यंत मद्यपान केले जात असल्याने परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही





दिवसांपूर्वी याच परिसरात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर किरण गावडे यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन त्या परिसरात नियमित पोलीस गस्त वाढविण्याची मागणी केली आहे.

तसेच डॉल्फिन इमारतीच्या बाजूला नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी नवीन विद्युत खांब उभारण्यात यावा, यासाठी पनवेल महानगरपालिकेकडेही त्यांनी निवेदन सादर केले आहे.याशिवाय अय्यप्पा मंदिराच्या पाठीमागील परिसरात महानगर गॅस कंपनीने खोदलेले खड्डे अद्याप योग्य प्रकारे न बुजविल्यामुळे पावसाळ्यात चिखल व घसरडी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघातांचा धोका वाढला आहे. याबाबतही पनवेल महानगरपालिकेकडे निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावेळी पनवेल महानगरपालिका विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अनिकेत मोहिते तसेच युवक आधारचे पत्रकार जगदीश क्षीरसागर यांनीही उपस्थित राहून नागरिकांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला. नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवून त्यावर उपाययोजना व्हाव्यात यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या मनसे विद्यार्थी सेनेचे विभाग अध्यक्ष किरण गावडे यांच्या या भूमिकेचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## ईपीएफ अंतर्गत ईडीएलआय विमा लाभ मिळवून देण्याची मागणी; तरुण कामगाराचा दुर्दैवी अपघाती मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : दि. 12 जून 2026 रोजी तळेगाव (भो.) ता. देवणी येथील रहिवासी तथा जागृती साखर कारखान्याचे कर्मचारी लक्ष्मण बालाजी लादे (वय 24 वर्षे) यांचे दुर्दैवी तळेगाव येथे दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास अपघाती निधन झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण बालाजी लादे हे आपल्या मोठ्या भावास राम बालाजी लादे, जे जागृती साखर कारखान्याच्या डिस्टिलरी प्लांटमध्ये कार्यरत आहेत, यांना जेवणाचा डबा देण्यासाठी मोटारसायकलने डबा देऊन परत स्वतःच्या गावी तळेगाव येथे जात असताना अपघातग्रस्त झाले. या अपघातात त्यांच्या छातीस गंभीर दुखापत झाली तसेच पायालाही जखम



झाली होती. अपघातानंतर काही काळ ते बोलण्याच्या स्थितीत होते. त्यानंतर उपचारासाठी उदगीर येथील रुग्णालयात नेत असताना वाटेतच त्यांची प्रकृती गंभीर बनली व डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.मयत लक्ष्मण बालाजी लादे हे जागृती साखर कारखान्याचे कर्मचारी असून ते कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) धारक सदस्य होते. तसेच ईपीएफ अंतर्गत कर्मचारी ठेव संलग्न विमा योजना (EDLI – Employees' Deposit Linked Insurance Scheme) लागू असल्यास नियमानुसार संबंधित विमा लाभ व इतर देय आर्थिक सहाय्य मयताच्या कायदेशीर वारसांना मिळणे अपेक्षित असल्याची मागणी होत आहे.

मयताच्या पश्चात आई-वडील व एक भाऊ असा परिवार आहे. दुर्दैवी घटनेनंतर कुटुंबीय अत्यंत शोकाकुल अवस्थेत असल्याने त्यांनी शवविच्छेदन (पोस्टमार्टम) करण्यास नकार दिल्याचे समजते. दरम्यान, संबंधित कामगार ईपीएफ सदस्य असल्यामुळे नियमानुसार ईडीएलआय (EDLI) विमा लाभ, पीएफ रक्कम, इतर वैधानिक देयके व लाभ मयताच्या कुटुंबास मिळण्यासाठी जागृती साखर कारखाना प्रशासनाने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सहकार्य व पाठपुरावा करावा, अशी मागणी तळेगाव भोगेश्वर ता. देवणी येथील शोकाकुल नातेवाईक व समस्त ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## जसपाल राणा : भारताचे सर्वोत्कृष्ट नेमबाज आणि प्रशिक्षक

भारताचे सर्वोत्कृष्ट पिस्तूल नेमबाज आणि आणि पॅरिस ऑलिम्पिक मध्ये मनू भाकरला दोन पदके मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलणारे प्रशिक्षक जसपाल राणा यांचे शुक्रवारी हृदय विकाराच्या झटक्याने अकस्मात निधन झाले त्यांच्या निधनाने क्रीडा विश्वावर शोककळा पसरली आहे. जसपाल राणा हे अवघ्या ४९ वर्षांचे होते. हे वय जाण्याचे नव्हतेच म्हणूनच त्यांचे निधन सर्वांना चटका लावून जाणारे ठरले. भारतातीलच नाही तर जगातील सर्वोत्कृष्ट नेमबाजांपैकी एक असणाऱ्या जसपाल राणा यांचा जन्म २८ जून १९७६ रोजी उत्तरकाशी येथे झाला. जसपाल राणा यांचे वडील नारायण सिंह राणा यांनी १९७१ च्या युद्धात इंडो तिबेटियन बॉर्डर पोलिसमध्ये सेवा बजावली होती आणि नंतर ते उत्तराखंडचे पहिले क्रीडामंत्री बनले. जसपाल राणा यांना लहानपणापासूनच नेमबाजीची आवड होती. त्यांच्या वडिलांनीच त्यांना नेमबाजीतील बाळकडू पाजले. त्यांचे वडील हेच त्यांचे नेमबाजीतील पहिले गुरू होते. वयाच्या १२ व्या वर्षीच त्यांनी नेमबाजीतील राष्ट्रीय स्तरावरील पहिले सुवर्णपदक जिंकले. त्यानंतर त्यांनी देशांतर्गत स्पर्धेत पदकांचा धडाका सुरू केला. जसपाल राणा यांनी आपल्या कारकिर्दीत ६०० हून अधिक



पदके जिंकले. १९९४ साली राष्ट्रकुल आणि आशियाई स्पर्धेत त्यांनी भारताच्या नेमबाजी संघाचे नेतृत्व केले. या दोन्ही महत्वाच्या आणि मोठ्या स्पर्धेत त्यांनी २५ मिटर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक जिंकले होते. २००६ सालच्या दोहा आशियाई क्रीडा स्पर्धेत यांनी तत्कालीन विश्वविक्रमाची बरोबरी करत तीन सुवर्णपदक व एक रौप्य पदक मिळविले होते. जसपाल राणा यांनी राष्ट्रकुल स्पर्धेत चारवेळा सहभाग घेतला आणि ९ सुवर्णपदकांसह १५ पदके मिळवली. ते राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचे सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू आहेत. राष्ट्रकुल असो की आशियाई क्रीडा स्पर्धा जसपाल राणा यांचे सुवर्णपदक निश्चित असायचे मात्र दुर्दैवाने त्यांना ऑलिम्पिकचे पदक मिळवता आले नाही. आपण जरी ऑलिम्पिक पदक मिळवू शकलो नाही तर देशासाठी ऑलिम्पिक पदक मिळवणारे खेळाडू निर्माण करण्याचे त्यांनी ठरवले आणि निवृत्ती नंतर खेळाडूंना नेमबाजीचे प्रशिक्षण द्यायला सुरुवात केली. २०१२ सालापासून ज्युनिअर पिस्तूल प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या जसपाल राणा यांनी सौरभ चौधरी, अनिश भानवाला आणि चिंकी यादव यासारख्या तरुण नेमबाजांना घडवलं. जसपाल राणा यांच्या कठोर प्रशिक्षण आणि मार्गदर्शनामुळे मनू भाकरने २०२४ च्या पॅरिस ऑलिंपिकमध्ये दोन कसंस्यादक जिंकले. प्रशिक्षक म्हणून हे त्यांचे सर्वात मोठे यश होते. खेळातील त्यांच्या अफाट योगदानाची आणि नेमबाजांच्या पुढील पिढीला घडवण्यात बजावलेल्या भूमिकेची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना २०२० साली प्रतिष्ठित द्रोणाचार्य पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या अचानक जाण्याने खेळाडूंना मोठा धक्का बसला आहे. मनू भाकरने ही बातमी ऐकताच आपला सामना थांबवला आणि पिस्तूल खाली टाकत जमिनीवर बसून रडू लागली. जसपाल राणा यांच्या निधनाने त्यांच्या शिष्यांचेच नाही तर संपूर्ण क्रीडा विश्वाचे मोठे नुकसान झाले आहे. एक खेळाडू आणि मार्गदर्शक म्हणून त्यांनी तरुण प्रतिभावंत खेळाडू घडवून क्रीडा विश्वात अतुल्य योगदान दिले. त्यांचे योगदान येणाऱ्या पिढीतील खेळाडूंना प्रेरणा देणारे ठरेल. जसपाल राणा यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**श्याम ठाणेदार**

## आई समाज कल्याण संस्थेच्या वतीने आयुष्मान भारत कार्ड नोंदणी व मोफत नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल | प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यात सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या आई समाज कल्याण संस्था, वावंजे यांच्या वतीने आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY) अंतर्गत आयुष्मान कार्ड नोंदणी शिबिर तसेच मोफत नेत्र तपासणी व सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या शिबिरामध्ये पात्र नागरिकांना आयुष्मान भारत योजनेअंतर्गत मिळणाऱ्या वार्षिक पाच लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य संरक्षणाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आयुष्मान कार्डसाठी आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, पात्रता तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि कार्ड तयार करून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.यावेळी अनेक नागरिकांमध्ये असलेला आयुष्मान कार्ड आणि ABHA कार्ड याबाबतचा संभ्रम दूर करण्यासाठी विशेष माहिती सत्र आयोजित करण्यात आले. आयुष्मान कार्ड हे आरोग्य विमा योजनेचा लाभ मिळवून देणारे साधन असून ABHA कार्ड हे डिजिटल आरोग्य ओळखपत्र



असल्याची माहिती लाभार्थ्यांना देण्यात आली.या शिबिरास लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटल यांचे सहकार्य लाभले. रुग्णांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्लाही देण्यात आला. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील नागरिकांनी या सेवांचा लाभ घेतला."आरोग्यदायी जीवन आणि निरोगी भविष्य" हा संदेश देत आई समाज कल्याण संस्थेने राबविलेला हा उपक्रम सामाजिक क्षेत्रातील एक आदर्श पाऊल ठरला आहे. शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा प्रकारची शिबिरे अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे मत उपस्थित नागरिकांनी व्यक्त केले.समाजहिताला प्राधान्य देत आरोग्यविषयक जनजागृती आणि नागरिकांना शासकीय योजनांशी जोडण्याचे कार्य सातत्याने सुरू ठेवण्याचा निर्धार संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करीत संस्थापक अब्दुल हाई शेख यांच्या संपूर्ण टीमचे आभार मानले.

## मंत्रालयातून 'एल-निनो'चा कागदी फतवा, पण श्रीवर्धनमध्ये पिण्याच्या पाण्यासाठीच वणवण!

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन -विशेष प्रतिनिधी** : मुंबईतील मंत्रालयात बसून अधिकारी पाणी जपून वापरण्याचे आणि सिंचनाचे पाणी बंद करण्याचे मोठ- मोठे आदेश सोडत आहेत. जलसंपदा विभागाने नुकतेच 'पाणीसाठा जपून वापरणे बाबत' या पत्राद्वारे ३१ ऑगस्टपर्यंत केवळ पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याचे फर्मान काढले खरे; मात्र श्रीवर्धन तालुक्यातील वास्तव या कागदी घोड्यांपेक्षा पूर्णपणे वेगळे आणि संतापजनक आहे. श्रीवर्धनमध्ये शेतीसाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा केलाच जात नाही, येथील मुख्य गरज केवळ पिण्याच्या पाण्याची आहे. असे असतानाही, उन्हाळ्याच्या उत्तरार्धात स्थानिक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तीव्र वणवण करावी लागत असल्याने प्रशासकीय नियोजनाचे पार धिंडवडे निघाले आहेत.

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी १३ जून रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासनाला पाणी पुरवठ्याबाबत कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. पण श्रीवर्धनमधील सद्यस्थिती पाहता हा आराखडा केवळ कागदावरच मर्यादित राहिल्याचे चित्र आहे.

**शेतीचा उपसा नाही, तरीही पिण्याचे पाणी गायब!**

शासनाच्या आदेशात प्रामुख्याने सिंचनाची आवर्तने बंद करणे आणि अनधिकृत शेती उपसा रोखण्यावर भर देण्यात आला आहे. परंतु, श्रीवर्धन तालुक भौगोलिक आणि स्थानिक परिस्थिती पाहता, येथे धरणांमधून शेतीसाठी पाणी उपसा केलाच जात नाही. श्रीवर्धन शहरला पाणी पुरवठा करणारे रानवली धरण हे एकमेव जलसाठे असून जलसाठे हे प्रामुख्याने स्थानिक नागरिकांची पिण्याच्या पाण्याची तहान भागवण्यासाठीच वापरले जातात. असे असूनही, सध्या अनेक गावांमध्ये आणि शहरातल्या प्रभागांमध्ये पिण्याचे पाणी वेळेवर आणि पुरेशा प्रमाणात येतच नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. "जर शेतीला पाणी जात नाही, तर मग हक्काचे पिण्याचे पाणी जाते कुठे?" असा संतप्त सवाल स्थानिक महिलांकडून विचारला जात आहे.

**कागदी समन्वय आणि ग्राउंडवरील शुकशुकाट**

मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रात स्थानिक स्वराज्य संस्था, पाणीपुरवठा विभाग आणि जलसंपदा विभाग यांच्यात 'प्रभावी समन्वय' ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, श्रीवर्धनमध्ये या विभागांमध्ये कसलाही समन्वय दिसत नाही. नळांना पाणी न येणे, कमी दाबाने पाणी येणे किंवा टँकरच्या फेऱ्यांचे विस्कळीत नियोजन यामुळे ऐन उन्हाळ्यात नागरिकांचे हाल होत आहेत. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत अखंडित पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन या पत्रात दिले असले, तरी जून महिन्याच्या सुरुवातीलाच जनतेला पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे.

# वृद्धांचा सन्मान : अत्याचारमुक्त समाजाची गरज

**१५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस वृद्ध व्यक्तींवरील वाढत्या अत्याचारांच्या समस्येकडे समाजाचे, शासनाचे आणि जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मानवी जीवनाच्या विविध टप्प्यांपैकी वृद्धत्व हा अत्यंत संवेदनशील आणि अपरिहार्य टप्पा आहे. प्रत्येक व्यक्तीला एक ना एक दिवस या अवस्थेत प्रवेश करावाच लागतो. आयुष्यभर कुटुंबासाठी, समाजासाठी आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात सन्मान, सुरक्षितता, प्रेम आणि आधार मिळणे अपेक्षित असते. परंतु बदलत्या सामाजिक संरचनेमध्ये, वाढत्या व्यक्तिकेंद्री विचारसरणीमध्ये आणि कौटुंबिक नात्यांमधील दुराव्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना विविध प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे वृद्ध अत्याचार हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न राहिलेला नसून तो एक गंभीर सामाजिक आणि मानवी हक्कांचा प्रश्न बनला आहे.**

भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठांचा आदर करण्याची परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते. अनेक ग्रंथांमध्ये आई-वडिलांचा सन्मान करण्याची शिकवण देण्यात आली आहे. "मातृदेवो भव, पितृदेवो भव" ही संकल्पना भारतीय संस्कृतीच्या केंद्रस्थानी राहिली आहे. संयुक्त कुटुंबपद्धतीमध्ये वृद्ध व्यक्ती हे कुटुंबाचे मार्गदर्शक, निर्णयकर्ते आणि अनुभवांचे भांडार मानले जात होते. त्यांच्या अनुभवाचा उपयोग पुढील पिढ्यांच्या घडणीत होत असे. परंतु कालांतराने औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणासाठी व रोजगारासाठी होणारे स्थलांतर, अणुकुटुंबपद्धतीचा वाढता प्रभाव आणि बदलती जीवनशैली यांमुळे ज्येष्ठ नागरिकांचे स्थान बदलू लागले. अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणा, दुर्लक्ष आणि भावनिक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो.

वृद्ध अत्याचार ही संकल्पना व्यापक आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, विश्वासाच्या नात्यामध्ये वृद्ध व्यक्तीवर होणारी कोणतीही कृती किंवा दुर्लक्ष ज्यामुळे त्या व्यक्तीला हानी, दुःख किंवा त्रास सहन करावा लागतो, त्याला वृद्ध अत्याचार असे म्हणतात. हा अत्याचार शारीरिक, मानसिक, आर्थिक, भावनिक किंवा सामाजिक स्वरूपाचा असू शकतो. अनेकदा अत्याचार करणारी व्यक्ती ही वृद्ध व्यक्तीची स्वतःची मुले, नातेवाईक, काळजीवाहक किंवा इतर परिचित व्यक्ती असते. त्यामुळे या प्रकारच्या अत्याचाराची तीव्रता अधिक वाढते.

शारीरिक अत्याचारामध्ये वृद्धांना मारहाण करणे, त्यांना जबरदस्तीने ढकलणे, त्यांच्या हालचालींवर बंधने घालणे किंवा आवश्यक वैद्यकीय उपचारांपासून वंचित ठेवणे यांचा समावेश होतो. वृद्ध व्यक्तींची शारीरिक क्षमता कमी झालेली असल्यामुळे अशा प्रकारच्या अत्याचारांचा त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. मानसिक किंवा भावनिक अत्याचारामध्ये सतत अपमान करणे, त्यांची टिंगल करणे, धमकावणे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा त्यांना कुटुंबातील निर्णयांपासून दूर ठेवणे यांचा समावेश होतो. यामुळे वृद्ध व्यक्तींमध्ये नैराश्य, भीती आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होतो.

आर्थिक अत्याचार हा आजच्या काळात वृद्धांवरील अत्याचाराचा अत्यंत गंभीर प्रकार ठरत आहे. वृद्ध व्यक्तींच्या संपत्तीवर बळजबरीने ताबा मिळविणे, त्यांच्या पेन्शन किंवा बचतीचा गैरवापर करणे, फसवणूक करून कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेणे किंवा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर नियंत्रण ठेवणे यांसारख्या घटना वाढताना दिसत आहेत. अनेक वृद्ध व्यक्ती आर्थिकदृष्ट्या आपल्या कुटुंबीयांवर अवलंबून असल्यामुळे किंवा भावनिक कारणांमुळे अशा अत्याचाराविरोधात आवाज उठवत नाहीत.

दुर्लक्ष हा वृद्ध अत्याचाराचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार आहे. वृद्ध व्यक्तींना वेळेवर अन्न न देणे, त्यांच्या आरोग्याची काळजी न घेणे, औषधोपचार टाळणे किंवा त्यांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करणे यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना कुटुंबामध्ये पूर्णपणे एकटे पाडले जाते, त्यांच्याशी संवाद साधला जात नाही किंवा त्यांना ओझे समजले जाते. हे दुर्लक्षही अत्याचाराचेच एक रूप आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिनाची संकल्पना वृद्ध व्यक्तींवरील अत्याचाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर उदयास आली. संयुक्त राष्ट्रसंघाने वृद्ध व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणाला प्राधान्य देत या विषयाकडे जागतिक समुदायाचे लक्ष वेधण्याचे प्रयत्न सुरू केले. या दिवसाचा उद्देश वृद्ध अत्याचाराविषयी जनजागृती निर्माण करणे, अत्याचाराची कारणे आणि परिणाम समजून घेणे तसेच त्याच्या प्रतिबंधासाठी सामूहिक कृतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

भारतामध्ये वृद्धांची संख्या सातत्याने वाढत आहे. आरोग्य सुविधांमध्ये झालेली सुधारणा आणि वाढलेले आयुर्मान यांमुळे वृद्ध लोकसंख्येचे प्रमाण वाढले आहे. लोकसंख्येतील या बदलामुळे वृद्धांच्या गरजा, समस्या आणि हक्क यांचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरले आहे. आर्थिक सुरक्षितता, आरोग्य सेवा, सामाजिक संरक्षण आणि भावनिक आधार या वृद्धांच्या मूलभूत गरजा आहेत. परंतु अनेक वृद्ध व्यक्तींना या गरजांची पूर्तता होत नसल्याचे दिसून येते.



वृद्ध अत्याचारामागील कारणांचा विचार केला असता अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक घटक समोर येतात. आर्थिक अवलंबित्व हे त्यांपैकी एक प्रमुख कारण आहे. अनेक वृद्ध व्यक्ती निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून राहतात. काही वेळा संपत्तीच्या वादांमुळे किंवा आर्थिक स्वार्थापोटी त्यांच्यावर अत्याचार केले जातात. व्यसनाधीनता, बेरोजगारी, कौटुंबिक तणाव आणि काळजीवाहकांवर येणारा मानसिक ताण यांमुळेही वृद्ध अत्याचाराची शक्यता वाढते.अत्याचाराचे परिणाम वृद्ध व्यक्तींच्या जीवनावर दूरगामी स्वरूपाचे असतात. सततचा मानसिक ताण, अपमान आणि दुर्लक्ष यांमुळे त्यांच्यामध्ये नैराश्य, चिंता आणि एकाकीपणाची भावना निर्माण होते. शारीरिक अत्याचारामुळे त्यांच्या आरोग्याच्या समस्या अधिक गंभीर होऊ शकतात. काही वृद्ध व्यक्ती अत्याचार सहन करण्यास कंटाळून सामाजिक जीवनापासून दूर जातात. अत्यंत गंभीर परिस्थितीत आत्महत्येचे विचारही त्यांच्या मनात येऊ शकतात.वृद्ध महिलांची परिस्थिती विशेषतः अधिक संवेदनशील असते. विधवापण, आर्थिक परावलंबित्व, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक भेदभाव यांमुळे त्यांना अधिक असुरक्षित परिस्थितीचा सामना करावा लागतो. ग्रामीण भागामध्ये राहणाऱ्या वृद्ध महिलांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षेचा अभाव अधिक तीव्रतेने जाणवतो. त्यामुळे वृद्ध महिलांसाठी विशेष धोरणे आणि संरक्षणात्मक उपाययोजनांची गरज आहे.

भारतात वृद्धांच्या संरक्षणासाठी विविध कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. 'पालक आणि वरिष्ठ नागरिक यांचे पालनपोषण व कल्याण अधिनियम, २००७' हा कायदा त्यापैकी महत्त्वाचा आहे. या कायद्याअंतर्गत मुलांना आणि वारसदारांना वृद्ध पालकांच्या देखभालीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. वृद्ध व्यक्तींना त्यांच्या पालनपोषणासाठी न्यायाधिकरणामार्फत आर्थिक सहाय्य मिळविण्याचा अधिकार देण्यात आला आहे. याशिवाय, वृद्धांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठीही विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत.केंद्र आणि राज्य शासनाकडून वृद्धांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविण्यात येतात. वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना, आरोग्यविषयक सुविधा, ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सवलती, हेल्पलाइन सेवा आणि वृद्धाश्रमांच्या माध्यमातून वृद्धांना आधार देण्याचा प्रयत्न केला जातो. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि त्याविषयी व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनाही वृद्धांच्या जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. वृद्धांसाठी समुपदेशन सेवा, आरोग्य तपासणी शिबिरे, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाचे कार्यक्रम आयोजित करून त्यांना मानसिक आणि सामाजिक आधार दिला जातो. अशा संस्थांच्या कार्यामुळे अनेक वृद्ध व्यक्तींना नव्याने जगण्याची प्रेरणा मिळते.

कुटुंब ही वृद्धांच्या संरक्षणाची सर्वात महत्त्वाची संस्था आहे. वृद्धांना प्रेम, सन्मान आणि भावनिक आधार देणे ही प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांना महत्त्व देणे आणि कौटुंबिक निर्णयप्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. वृद्धांना ओझे समजण्याऐवजी त्यांना कुटुंबाचा अविभाज्य भाग म्हणून स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

शैक्षणिक संस्थांमध्ये मूल्यशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्येष्ठांविषयी आदरभाव निर्माण करणे आवश्यक आहे. पिढ्यांमधील संवाद वाढविणारे उपक्रम राबविल्यास तरुण पिढीला वृद्धांच्या अनुभवांचे महत्त्व समजून घेता येईल. माध्यमांनीही वृद्धांच्या प्रश्नांना संवेदनशीलतेने हाताळत सकारात्मक जनजागृती घडवून आणणे आवश्यक आहे.

डिजिटल युगात वृद्ध व्यक्तींना तंत्रज्ञानाची माहिती करून देणेही महत्त्वाचे ठरते.

ऑनलाइन फसवणुकीपासून बचाव करण्यासाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने दूर राहणाऱ्या कुटुंबीयांशी संपर्क साधणे आणि सामाजिक संबंध टिकवून ठेवणे शक्य होते.

वृद्धत्व हा जीवनाचा नैसर्गिक टप्पा आहे. आजचे वृद्ध हे कालचे समाजनिर्माते, कुटुंबाचे आधारस्तंभ आणि राष्ट्राच्या विकासात योगदान देणारे नागरिक आहेत. त्यांच्या कष्टामुळे आणि त्यागामुळे अनेक पिढ्या घडल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे.

जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन हा आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतो. आपण आपल्या घरातील वृद्ध व्यक्तींशी कसे वागतो, त्यांच्या गरजांकडे कितपत लक्ष देतो आणि त्यांना कितपत सन्मान देतो याचा विचार करण्याची गरज आहे. वृद्धांचा सन्मान ही केवळ औपचारिकता नसून ती आपल्या संस्कृतीची आणि मानवतेची खरी ओळख आहे.

समाजाच्या प्रगतीचे मोजमाप केवळ आर्थिक विकासाच्या निकषांवर करता येत नाही. तो समाज आपल्या दुर्बल आणि ज्येष्ठ घटकांशी कसा वागतो यावरही त्याचे मूल्यमापन केले जाते. वृद्ध व्यक्तींचा सन्मान करणारा, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारा आणि त्यांना सुरक्षित व आनंदी जीवन जगण्याची संधी देणारा समाजच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत आणि प्रगत ठरतो.

१५ जूनच्या निमित्ताने आपण सर्वांनी वृद्ध अत्याचाराला ठामपणे नकार देण्याचा संकल्प केला पाहिजे. शासन, स्वयंसेवी संस्था, माध्यमे, शैक्षणिक संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांनी एकत्रितपणे कार्य करून वृद्धांसाठी अत्याचारमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविणे आणि त्यांच्या जीवनात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हीच या दिनाची खरी सार्थकता ठरेल.

आज आपण वृद्धांचा सन्मान करू, त्यांच्या हक्कांचे रक्षण करू आणि त्यांना प्रेमाने साथ देऊ, तर उद्याच्या आपल्या वृद्धत्वालाही सन्मानाची हमी मिळेल. त्यामुळे 'वृद्धांचा आदर - अत्याचाराला नकार' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत आणि प्रत्येक मनापर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे.

वृद्धांचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आणि अत्याचारमुक्त वृद्धत्व हीच सभ्य समाजाची खरी ओळख आहे.

डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# ओव्याच्या पानांची भजी खाल्ल्याने शरीराला मिळतात अनेक फायदे

ओव्याची पाने (अजवाइनची पाने) औषधी गुणधर्मांनी समृद्ध मानली जातात. या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट, अँटीबॅक्टेरियल आणि दाहशामक गुणधर्म आढळतात, जे शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरतात. ओव्याची पाने पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करतात. अपचन, गॅस, पोटफुगी आणि ॲसिडिटी यांसारख्या समस्यांमध्ये ओव्याची पाने चावून खाल्ल्यास किंवा त्यांचा काढा घेतल्यास आराम मिळू शकतो.

ओव्याच्या पानाचे फायदे

सर्दी, खोकला आणि घशातील खवखव कमी करण्यासाठीही ओव्याची पाने उपयुक्त मानली जातात. त्यांच्या



नैसर्गिक गुणधर्मांमुळे श्वसनमार्गातील कफ कमी होण्यास मदत होते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही ही पाने फायदेशीर ठरू शकतात.

ओव्याच्या पानांमध्ये जीवनसत्त्वे आणि खनिजे असल्यामुळे शरीराला आवश्यक पोषण मिळते. सांधेदुखी किंवा शरीरातील सूज कमी करण्यासाठीही त्यांचा उपयोग केला जातो. काही लोक त्वचेवरील किरकोळ संसर्ग किंवा कीटकदंशावर ओव्याच्या पानांचा रस लावतात, ज्यामुळे आराम मिळू शकतो.

नियमित आणि योग्य प्रमाणात ओव्याची पाने आहारात समाविष्ट केल्यास पचन सुधारण्यास, सर्दी-खोकल्यापासून संरक्षण मिळवण्यास आणि एकूण आरोग्य चांगले ठेवण्यास मदत होऊ शकते. मात्र कोणतीही गंभीर आरोग्य समस्या असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

ओव्याच्या पानांची भजी देखील आरोग्यासाठी फायदेशीर

ओव्याच्या पानांची भजी हा अनेक घरांमध्ये आवडीने खाल्ला जाणारा पारंपरिक पदार्थ आहे. चवदार असण्यासोबतच ओव्याच्या पानांमधील औषधी गुणधर्मांमुळे या भजींचे काही आरोग्यदायी फायदेही मिळू शकतात. ओव्याची पाने पचनास मदत करणारी मानली जातात. त्यामुळे ओव्याच्या पानांची भजी खाल्ल्याने अपचन, गॅस आणि पोटफुगी यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते.

ओव्याच्या पानांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास हातभार लावतात. पावसाळ्यात किंवा थंड हवामानात गरमागरम ओव्याच्या पानांची भजी खाल्ल्याने सर्दी-खोकल्याचा त्रास कमी होण्यास मदत मिळू शकते. तसेच घशाला आराम मिळण्यासही मदत होते.

ओव्याची पाने शरीरातील सूज कमी करण्यास मदत करणारे घटकही पुरवतात. त्यामुळे सांधेदुखी किंवा अंगदुखी असलेल्या व्यक्तींना याचा काही प्रमाणात फायदा होऊ शकतो. शिवाय या पानांमध्ये काही महत्त्वाची जीवनसत्त्वे आणि खनिजे असल्याने शरीराला पोषणही मिळते.

मात्र, भजी तळलेली असल्याने ती मर्यादित प्रमाणात खाणे अधिक योग्य ठरते. जास्त प्रमाणात तळलेले पदार्थ खाल्ल्यास कॅलरी आणि चरबीचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे ओव्याच्या पानांची भजी चवीसोबतच संतुलित आहाराचा भाग म्हणून खाल्ल्यास त्यांचा अधिक चांगला लाभ मिळू शकतो.

# पावसाळी ट्रिपसाठी कोकणातील ठिकाणे



मान्सूनमध्ये कोकणात वन-डे ट्रिप किंवा वीकेंडसाठी प्लॅन करत असाल, तर सर्वोत्तम ठिकाणे पाहूयात.

मारळेश्वर : सह्याद्रीच्या कुशीत वसलेले मारळेश्वर हे ठिकाण पावसाळ्यात निसर्गाचा चमत्कार दाखवते. येथे तुम्ही नयनरम्य दृष्ये पाहू शकता. आकर्षण म्हणजे कड्यावरून कोसळणारा धबधबा. महादेवाचे येथे असलेले मंदिरही तुम्ही पाहू शकता.

हरिहरेश्वर : उधाणलेला समुद्र पाहण्यासाठी तुम्ही हरिहरेश्वरला जाऊ शकता. या ठिकाणाला दक्षिण काशी देखील म्हणतात. येथील मंदिराच्या पाषाणावर आदळणाऱ्या लाटा पाहणे हा अनुभव तुम्ही नक्की घेऊ शकता.

आंबोली : कोकणची चेरापुंजी म्हणून ओळखले जाणारे हे थंड हवेचे ठिकाण पावसाळ्यात धुक्याने आणि अनेक लहान-मोठ्या धबधब्यांनी वेढलेले असते. पावसाळ्यात फिरण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

गणपतीपुळे : शांत समुद्रकिनारा आणि पावसाळी वातावरण काय असते हे पाहण्यासाठी गणपतीपुळे उत्तम पर्याय आहे.

मुरूड जंजिरा : पावसाळ्यात समुद्राच्या खवळलेल्या लाटा आणि समुद्राच्या मधोमध असलेला अभेद्य किल्ला पाहणे इतिहासाप्रेमींसाठी पर्वणी असते. तुम्ही पावसाळ्यात मुरुज जंजिऱ्याला जाऊ शकता.

# जांभूळ आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर, पण 'या' पदार्थांसोबत खाल्ल्यास वाढू शकते ॲसिडिटी आणि अपचन



जांभूळ हे उन्हाळा आणि पावसाळ्यात मिळणारे लोकप्रिय फळ आहे. चवीला आंबट-गोड आणि तुरट असणाऱ्या जांभळामध्ये अँटीऑक्सिडंट्स , व्हिटॅमिन-सी आणि अनेक पोषक घटक असतात. पचनक्रिया सुधारण्यासाठी आणि रक्तातील साखरेचे व्यवस्थापन करण्यासाठीही जांभूळ फायदेशीर मानले जाते. मात्र, जांभूळ खाताना काही गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेदात काही अन्नपदार्थांचे चुकीचे मिश्रण 'विरुद्ध आहार' मानले जाते. तर आधुनिक पोषणशास्त्रानुसारही काही फूड कॉम्बिनेशन काही लोकांमध्ये गॅस, ॲसिडिटी, अपचन किंवा पोटाच्या तक्रारी वाढवू शकतात. तज्ज्ञांच्या मते जांभूळ आणि काही पदार्थ एकत्र खाणे टाळले तर पचनसंस्थेवरील ताण कमी होऊ शकतो.

**जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच दूध घेऊ नका**

जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच दूध प्यायल्यास काही लोकांना पोटदुखी, गॅस, अपचन आणि पोट फुगण्यासारख्या समस्या जाणवू शकतात. जांभळामध्ये टॅनिन्स आणि नैसर्गिक आम्ल असतात.

दूधातील केसिन प्रोटीन आणि जांभळातील काही घटक यामुळे पचन प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जांभूळ आणि दूध यांच्यामध्ये किमान १ ते २ तासांचे अंतर ठेवणे योग्य मानले जाते.

जांभूळ आणि लोणचे एकत्र खाणे टाळा

लोणच्यामध्ये मीठ, तेल आणि मसाल्यांचे प्रमाण जास्त असते. जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच लोणचे खाणे काही लोकांसाठी त्रासदायक ठरू शकते. लोणच्यातील जास्त मीठ, मसाले आणि आंबटपणामुळे काही लोकांमध्ये घशात खवखव, ॲसिडिटी किंवा पचनाशी संबंधित समस्या जाणवू शकतात.जांभूळ खाल्ल्यानंतर मसालेदार पदार्थ खाणे टाळल्यास पोटावर अनावश्यक ताण पडत नाही.

**जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच हळदीचे पदार्थ घेऊ नका**

परंपरागत आहार पद्धतींमध्ये जांभूळ आणि हळद यांचे एकत्र सेवन टाळण्याचा सल्ला दिला जातो. काही लोकांना जांभूळ खाल्ल्यानंतर हळदयुक्त पदार्थ घेतल्यास पोटात जळजळ किंवा अस्वस्थता जाणवू शकते.

मात्र, या दाव्याला पुरेसे वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नसल्याने प्रत्येक व्यक्तीच्या शरीराच्या प्रकृतीनुसार परिणाम वेगळा असू शकतो.

**जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच पाणी पिणे टाळा**

अनेकांना जांभूळ खाल्ल्यानंतर लगेच पाणी प्यायल्याने पोट बिघडल्याचा अनुभव येतो. त्यामुळे साधारण ३० ते ४० मिनिटांनी पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो.

जांभळातील फायबर आणि नैसर्गिक आम्ल पचन प्रक्रियेत भूमिका बजावतात. लगेच पाणी घेतल्यास काही लोकांमध्ये पोट फुगणे, गॅस किंवा अस्वस्थता निर्माण होऊ शकते.

**रिकाम्या पोटी जांभूळ खाणे टाळा**

जांभूळ चवीला तुरट आणि आंबट असल्याने रिकाम्या पोटी खाल्ल्यास काही लोकांना ॲसिडिटी, पोटात दुखणे किंवा जळजळ होऊ शकते.

ज्यांना आधीपासून ॲसिडिटी किंवा संवेदनशील पचनसंस्थेची समस्या आहे, त्यांनी जांभूळ हलका नाश्ता किंवा जेवणानंतर खाणे अधिक योग्य ठरू शकते.